





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०४.०२.२०२५ | अंक नं. २८३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाचे कार्यक्षम
आमदार
सिध्दार्थदादा अनिलराव शिरोळे
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

प्रशांत मारुती शिरोळे । राहुल मारुती शिरोळे
समस्त शिरोळे परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रॅक्टीस मेक्स परफेक्ट... खेळाडूंना सराव महत्त्वाचा

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

आपला देश तरुणांचा आहे. सध्या २४% लोकसंख्या ही १४ वर्षाखालील मुलांची आहे. या तरुणाईचे करिअर, आरोग्य व भवितव्य उज्ज्वल, सक्षम बनवल्यास महासत्ता बनण्याची पायवाट सुकर होईल. अर्थातच त्यासाठी शारीरिक शिक्षण व खेळाचे महत्त्व वाढवावे लागेल. चीनने खेळ व उद्योग यांच्यात अनोखा ताळमेळ घातला असून, त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था भक्कम राहात आली आहे.

तेथील खेळाडू देखील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत किर्तीमान स्थापित करत असतात. आपणही ते साध्य करू शकतो. आपल्या तरुण पिढीच्या अंगी तेवढी शक्ती, ताकद, क्षमता आणि कौशल्य आहे. फक्त त्याला चालना, प्रोत्साहन देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न निरंतर करावे लागतील. वातावरण निर्माण होत आहे ते शालेय स्तरापासून कॉलेज स्तरावर मोठ्या प्रमाणावर वाढवावे लागेल.



सुरू झालेले नववर्ष हे त्या दिशेने एक टप्पा ठरू शकतो. यंदाच्या वर्षी अनेक स्पर्धा रंगणार असून, यात भारतीय खेळाडू यशाच्या पायऱ्या सर करण्याचे काम करतील. त्यासाठी खेळाडूंना सर्वोत्तम सरावावर निरंतर भर द्यावा लागेल.

पालक, क्रीडाशिक्षक, शालेय संस्था, क्रीडाप्रेमींनी विशेष लक्ष व सहकार्य केल्यास खेळाडू वाढतील. हळूहळू त्यांना सरावाची सवय लावून मैदाने गजबजली तर समाज स्वास्थ्यही छान राहील. बाकी खेळाडू मित्रांनो तुम्ही मात्र नियमित व्यायाम, सराव करा.. यश टप्प्यातच असेल...

# प्रयागराजला कुंभमेळ्यासाठी गेलेल्या अहिल्यानगरच्या भाविकाचा दुर्दैवी मृत्यू

नगर – उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे कुंभमेळ्यासाठी गेलेल्या नगरमधील भाविकाचा हृदयविकाराने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मच्छिंद्र पांडुरंग मेहेत्रे (वय ५२, रा.एम एस क्वाटर्स, चांदणी चौक, नगर, मूळ रा.अकोळनेर, ता.नगर) असे मयत भाविकाचे नाव आहे.

मच्छिंद्र मेहेत्रे हे लष्कराच्या एम एस विभागात नोकरीला होते. ८ दिवसांपूर्वी त्यांचे नातेवाईकांसह ते प्रयागराज येथे कुंभमेळ्यानिमित्त दर्शनासाठी गेले होते. तेथे दर्शन झाल्यावर परतीच्या तयारीत असताना त्यांना त्रास होऊ लागल्याने नातेवाईकांनी त्यांना तेथील रुग्णालयात दाखल केले. तेथे २ दिवस उपचार घेतल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना नगरला आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यामुळे तेथून रुग्णवाहिकेद्वारे त्यांना नगरकडे आणले जात असताना ३ फेब्रुवारीला सायंकाळी ६ च्या सुमारास नेवासा फाटा येथे आल्यावर त्यांची प्रकृती आणखी खालावली. त्यांना रुग्णवाहिकेद्वारे सायंकाळी ७ च्या सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.खेडकर यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतची माहिती नगर तालुका पोलिसांना कळविण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

मयत मच्छिंद्र मेहेत्रे यांच्यावर नगरच्या नालेगाव अमरधाममध्ये ४ फेब्रुवारीला सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ विवाहित मुली, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

# विशिष्ट समाजाची टोळी नेवून नगरजवळील शेतकऱ्याच्या जमिनीवर ताबा मारण्याचा प्रयत्न

## गहू पिकाचे केले नुकसान, तिघांसह 'त्या' टोळीविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – विशिष्ट समाजाच्या महिला व पुरुषांच्या १० ते १२ जणांच्या टोळीला घेवून जात शेतकऱ्याच्या शेतजमिनीत बेकायदेशीरपणे घुसून ताबा मारण्याचा प्रयत्न तसेच गव्हाच्या पिकाचे नुकसान केल्याची घटना ३ फेब्रुवारीला सकाळी ९ च्या सुमारास नवनागापूर शिवारात शेंडी बायपास रोड लगत असलेल्या गव्हाणे वस्ती येथे घडली. या प्रकरणी तिघा जणांसह त्या विशिष्ट समाजाच्या टोळी विरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नवनाथ दामोधर गव्हाणे (वय ४६, रा. गव्हाणे वस्ती, नवनागापूर शिवार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची गव्हाणे वस्ती परिसरात शेत जमीन असून त्यांच्या शेजारी असलेल्या शेत जमिनीचे मालक रोहन पोपट बारस्कर व रोहित पोपट बारस्कर यांचे शेतीच्या बांधावरून वाद आहेत. फिर्यादी गव्हाणे यांनी त्यांना सरकारी मोजणी करून या बाबत शहानिशा करू असे सांगितले होते. मात्र ३ फेब्रुवारीला सकाळी ९ च्या सुमारास रोहन व रोहित बारस्कर, रवि भीमराज भोर उर्फ बाल्या हे तिघे एका विशिष्ट समाजाच्या महिला व पुरुषांच्या १० ते १२ जणांच्या टोळीला घेवून गव्हाणे यांच्या शेतात घुसले, तेथे अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने शेतात असलेल्या गव्हाच्या पिकाचे नुकसान केले.

हा प्रकार सुरु असताना गव्हाणे यांनी एमआयडीसी पोलिसांना फोन करून माहिती दिली. पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत त्यांचा वाद मिटवला. त्यानंतर नवनाथ गव्हाणे यांच्या फिर्यादी वरून रोहन व रोहित बारस्कर, रवि भोर या तिघांसह विशिष्ट समाजाच्या महिला व पुरुषांच्या १० ते १२ जणांच्या टोळी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## वैशाली नागपुरे यांचे आकस्मिक निधन



नगर – भिंगार येथील माळगल्लीतील शुक्लेश्वर कॉलनी येथील रहिवासी वैशाली सुनील नागपुरे (वय ५०) यांचे २ फेब्रुवारीला सकाळी आकस्मित निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सून असा परिवार आहे.

## भुमय्या मेहसुनी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चितळे रोड येथील मेहसुनी टेलर्सचे संचालक भुमय्या यल्लय्या मेहसुनी (वय ७५) यांचे ३ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# नगर अर्बन बँकेतील ५ लाखांच्या पुढील ठेवीदारांना लवकरच ठेवींची रक्कम मिळण्याचे संकेत : बँक बचाव समितीची माहिती

### कर्जदारांच्या मालमत्तांच्या लिलावासाठी त्रिस्तरीय समिती स्थापन होणार

नगर – नगर अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत देण्याच्या प्रक्रियेला गती येणार असून साधारणपणे मार्च महिन्यात ११० कोटी रुपयांचे वाटप होण्याचे संकेत आहेत. यात ५ लाखांच्या पुढे ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना ठेवींच्या ५० टक्के प्रमाणात रक्कम मिळण्याची शक्यता असल्याची माहिती बँक बचाव कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली. कर्जदारांच्या मालमत्तांचा ताबा घेऊन लिलाव करण्यासाठी त्रिस्तरीय समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

बँक बचाव कृती समितीचे राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, अच्युत पिंगळे, विलास कुलकर्णी, अवधूत कुक्कडवाड, डी. एम. कुलकर्णी, मनोज गुंदेचा आदींनी ४ फेब्रुवारीला सकाळी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, २ दिवसांपूर्वी नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेतली. पाच लाखांपेक्षा अधिक ठेव रक्कम ठेवलेल्या ठेवीदारांचे २२० कोटी रुपये अडकले आहेत. पालकमंत्र्यांनी ठेवीची रक्कम परत मिळण्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अर्बन बँकेचे प्रशासक गणेश गायकवाड, अर्बन बँक कृती समितीचे सदस्यांच्या समवेत बैठक घेतली. यावेळी ठेवीदार उपस्थित होते.

प्रशासक गणेश गायकवाड यांनी बँकेच्या सद्यस्थितीची माहिती दिली. डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनने (डीआयसीजीसी) ५ लाखांच्या आतील ठेवीदारांची रक्कम दिली आहे. डीआयसीजीसीने मोठ्या कर्जदारांच्या मालमत्तांची खाते गोठविलेली आहेत. बँकेच्या प्रशासन मंडळाने कर्ज वसुली करून डीआयसीजीसीला ही रक्कम परत केली आहे. डीआयसीजीसीच्या परवानगी आता मोठ्या कर्जदारांच्या मालमत्तांची खाती खुले करून प्रत्यक्षात ताबा घेणे, लिलाव ही प्रक्रिया करून ठेवीदारांना ठेवींची रक्कम देण्याची प्रक्रिया करता येईल. या प्रक्रियेसाठी महसूल प्रशासनातील अधिकारी आणि पोलीस बंदोबस्ताची आवश्यकता लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक आणि बँक प्रशासनाचा एक अधिकारी अशा तीन अधिकाऱ्यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश पालकमंत्री विखे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

डीआयसीजीसीशी अर्बन बँकेने पत्रव्यवहार केलेला आहे. त्यांच्याकडून गोठविलेली खाती सील करण्यास परवानगी मिळण्यास फेब्रुवारी–मार्च महिन्यापर्यंत ही कार्यवाही होण्याची शक्यता आहे. त्यानंतर मोठ्या कर्जदारांच्या मालमत्ता ताब्यात घेणे, लिलाव करणे ही प्रक्रिया पार पाडून मोठ्या ठेवीदारांना पहिल्या टप्प्यात पन्नास टक्क्यांपर्यंत ठेवी मिळू शकतात. बँक बचाव कृती समितीने केलेल्या अभ्यासपूर्ण व कायदेशीर पाठपुराव्यामुळे तसेच प्रशासक गणेश गायकवाड यांनी केलेल्या प्रभावी कारभारामुळे बँकेच्या ठेवीदारांसाठी सकारात्मक व आशादायी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे समितीच्यावतीने यावेळी सांगण्यात आले.

## शिमोन मिसाळ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – प्रकाशपूर तारकपूर येथील रहिवासी शिमोन आनंदराव मिसाळ (वय ८४) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. सॅमसन मिसाळ यांचे ते वडील होत.

## कांतीलाल मंडलेचा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – टाकळीमानूर येथील रहिवासी कांतीलाल मिश्रीलाल मंडलेचा (वय ६९) यांचे ३ फेब्रुवारीला आजाराने निधन झाले. त्यांच्यावर टाकळीमानूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्वप्निल मंडलेचा यांचे ते वडील होत.

## आसाराम मेहेत्रे यांचे अल्प आजाराने निधन




नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी आसाराम पुंजाजी मेहेत्रे (वय ७४) यांचे ३ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, पत्नी, नातवंडे असा परिवार आहे. बबन, शिवाजी, अंबादास मेहेत्रे यांचे ते वडील होत.

## सुरेश चिपाडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – माळीवाडा गोंधळे गल्ली येथील रहिवासी सुरेश किसन चिपाडे (चेअरमन, वय ५०) यांचे ३१ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार नालेगाव अमरधाम येथे करण्यात आले. त्यांच्या मागे वडील, २ भाऊ, भावजया, चुलते, पुतणे असा परिवार आहे. ते गंज बाजार येथील भाजी विक्रेते होते.

## सूर्यभान लांडगे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पिंपळगाव लांडगा येथील सूर्यभान सावळेराम लांडगे (वय ८४) यांचे ४ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्ष व दै. लोकआवाजचे संपादक विठ्ठलराव लांडगे, जिल्हा ऑडिटर संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग लांडगे यांचे वडील तसेच अहिल्यानगर इलेक्ट्रीकल डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब परभणे यांचे ते सासरे होत. अनेक वर्षे त्यांनी पंढरपूर वारी दर्शन नियोजन सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

# 'महाराष्ट्र केसरी स्पर्धेत' पंचांबरोबर सेटिंग करत पृथ्वीराज मोहोळला विजयी घोषित केल्याचा आरोप

### महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या आयोजकांसह धुडगूस घालणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा

नगर – महाराष्ट्राच्या दैदीप्यमान अशा कुस्ती परंपरेला काळिमा फासण्याचा प्रकार दुर्दैवाने अहिल्यानगर शहरामध्ये घडला. मॅच फिक्सिंग करून शिवराज राक्षे याला हरविण्यात आले. पंचांबरोबर आयोजकांनी सेटिंग करत पृथ्वीराज मोहोळ याला विजयी घोषित केले. स्पर्धा ही पारदर्शी व्हायला हवी होती. सबंध महाराष्ट्राने ही मॅच फिक्सिंग सोशल मीडिया, प्रसारमाध्यमांवरून होणाऱ्या थेट प्रसारणाच्या माध्यमातून पाहिली आहे. शिवराज राक्षेवर अन्याय झाला आहे. तमाम कुस्ती प्रेमींच्या मनातील खरा महाराष्ट्र केसरी हा शिवराजच असल्याचे शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी म्हटले आहे.

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेवरून मोठे वादंग निर्माण झाले आहे. याबाबत बोलताना किरण काळे म्हणाले की, पृथ्वीराज मोहोळलाच महाराष्ट्र केसरीचा किताब द्यायचा हे पूर्वनियोजित कटकारस्थान होते. त्यासाठी सोयीच्या जोड्या सुरुवातीपासून लावल्या गेल्या. शिवराजचे दोन्ही खांदे समांतररित्या टेकलेले नसताना देखील पंचांनी मोहोळ याला विजयी घोषित केले. याबाबत महाराष्ट्रातील अनेक नामांकित मल्ल आणि पंचांनी शिवराजवर अन्याय झाल्याचे जाहीररित्या मत प्रगट केले आहे. शिवराजने रिप्लेची केलेली मागणी देखील पंचांनी धुडकावून लावली. अंतिम सामन्यातील प्रतिस्पर्धी खेळाडू गायकवाड हा देखील सामना सोळा सेकंद शिल्लक असताना आधीच मैदान सोडून निघून गेला, हे देखील संशयास्पद आहे.

### शिवराजवरील बंदी उठवा

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने शिवराज राक्षेवर दोन वर्षांची घातलेली बंदी अत्यंत चुकीची आणि अन्यायकारक आहे. एकीकडे त्याच्यावर फिक्सिंग करत अन्याय करायचा आणि वरतून त्याच्यावरच कारवाई करत त्याचं करिअर संपवायचं हे पाप परिषदेने करू नये. शिवराजवरील बंदी तात्काळ उठवावी, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

### आयोजकांसह धुडगूस घालणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा

स्पर्धेच्या ठिकाणी तुफान राडेबाजी झाली. त्या ठिकाणी शिवराज राक्षेचा आवाज दाबण्यासाठी गोंधळ घातला गेला. आयोजकांच्या कार्यकर्त्यांनी खुर्च्यांची तोडफोड केली. धक्काबुक्कीचा प्रकार घडला. उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, क्रीडामंत्री, केंद्रीय मंत्री यांच्या उपस्थितीत हा घडलेला प्रकार अहिल्यानगरला काळीमा फासणारा आहे. पृथ्वीराज मोहोळला जिंकविण्यासाठी आयोजकांनी पंचांना हाताशी धरत केलेल्या सेटिंगमुळे राडेबाजी, तोडफोड झाली आहे. आयोजकांशी संबंधित कार्यकर्त्यांनी धुडगूस घातला आहे. घटनेचे फुटेज पोलिसांनी तपासून आयोजकांसह धुडगूस घालणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी जाहीर मागणी किरण काळे यांनी केली आहे.

### नरसिंह यादव प्रकरणाची आठवण

अनेक वर्षांपूर्वी वाडिया पार्कच्याच मैदानावर झालेल्या कुस्ती सामन्यांच्या वेळी देशातील प्रसिद्ध मल्ल नरसिंह यादव याला शहरातील एका बड्या राजकीय नेत्याच्या टोळक्याने मारहाण केली होती. त्यावेळी आपण आयुष्यात पुन्हा कधी नगर शहरात येणार नाही असे उद्विग्न उद्गार यादवने काढले होते. यंदाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेमुळे लागलेल्या गालबोटामुळे त्या जुन्या प्रकरणाची आठवण होत आहे. स्पर्धा जर पारदर्शकरित्या घ्यायच्या नव्हत्या तर आयोजक व्हायचं कशाला, असा सवाल किरण काळे यांनी केला आहे.

### आम्ही तसे केले नाही

मनोज गुंदेचा म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी किरण काळे युथ फाऊंडेशनच्यावतीने राज्यस्तरावरील छत्रपती शिवराय केसरी कुस्ती स्पर्धा अहिल्यानगर शहरात याच वाडिया पार्कच्या ग्राउंडवर भरवण्यात आली होती. त्यावेळी देखील ८०० हून अधिक मल्ल स्पर्धेत सहभागी झाले. प्रेक्षकांची गर्दी होती. मात्र अत्यंत पारदर्शक पद्धतीने स्पर्धा पार पडली. कुठेही वाद, गोंधळ न होता स्पर्धा झाली. आम्ही महाराष्ट्र केसरीच्या आयोजकां सारखी मॅच फिक्सिंग केली नाही.

## शेतकऱ्यांनी अधिकृत कृषी सेवा केंद्रातूनच बियाणे, औषधे खरेदी करावीत

नगर – नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यात मेशी परिसरात लागवड केलेल्या उन्हाळी कांद्यावर तननाशकाची फवारणी केल्यामुळे शंभर एकरपेक्षा जास्त क्षेत्रावरील कांदा पीक नष्ट झाले असुन कोट्यावधी रुपयांचे नुकसानाची बातमी कळाली.

या बाबत बोलताना अहमदनगर जिल्हा खते, बियाणे, किटकनाशके संघटनेचे अध्यक्ष छबुराव हराळ म्हणाले की शेतकऱ्यांनी अनेक संकटाचा सामना करुन कांदा लागवड केली होती. मात्र कंपनीच्या सदौष औषधामुळे शेतकरी मात्र पूर्णतः उध्वस्त झाला असुन अस्मानी सोबत सुल्तानी संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रातुनच कृषी निविष्ठा खते, बियाणे, तननाशके, किटकनाशके खरेदी करावीत, सोबत पक्के बिल घ्यावे. इतर ठिकाणावरुन ऑनलाईन किंवा बांधावर येऊन विक्री करण्यार्या कंपनीची कुठलीही गॅरंटी नसते, त्यामुळे परवानाधारक अधिकृत विक्रेत्या शिवाय इतर ठिकाणावरुन कृषी निविष्ठा खरेदी करु नयेत, नुकसान होण्याची दाट शक्यता आसते असे आवाहन शेतकऱ्यांना केले आहे.

भावपूर्ण श्रध्दांजली



कै.इंद्रजीत दादा कांबळे (दाजी)

प्रथम पुण्यस्मरण

बुधवार दि.५/२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता

स्थळ : सारडा कॉलेजमागे, सिध्दार्थनगर, अहिल्यानगर

टीप : ह.भ.प. ॲड.राजश्रीताई कडलग महाराज (रामायण-भागवत कथाकार,कीर्तनकार) राजमाता जिजाऊ रत्न पुरस्कार प्राप्त

ह.भ.प.प्रेममूर्ती श्री. राजेंद्र महाराज कडलग (महाराष्ट्रातील प्रथम पदवीधर, कीर्तनकार)

: शोकाकूल :

कांबळे परिवार व नातेवाईक, मित्र मंडळ

# नगर शहरात आढळले जीबीएस संशयित ४ रुग्ण

## खाजगी रुग्णालयात उपचार सुरु, सर्वांची प्रकृती स्थिर

नगर – गुलीयन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) नावाच्या आजाराने पुण्यात थैमान घातले असतानाच अहिल्यानगर शहरातील रुग्णालयात जीबीएस संशयित चार रुग्ण आढळल्याचे समोर आले आहे. हे चौघेही रुग्ण शहराबाहेरील असून एकाला पुणे येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. तर, तिघांवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सुधारत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा रुग्णालयात एक अल्पवयीन मुलगी जीबीएस संशयीत आढळल्याने तिला तपासणीसाठी पुणे येथे पाठवण्यात आले आहे. सदर मुलगी ही जिल्ह्याबाहेरील असल्याचे सांगण्यात आले. तर, शहरातील खासगी रुग्णालयात तीन संशयित रुग्ण आढळल्याची माहिती महापालिकेकडे प्राप्त झाली आहे. त्या तिघांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे. खासगी रुग्णालयात आढळलेले रुग्ण आष्टी (बीड), वाकोडी व राहुरी तालुक्यातील आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.


दरम्यान, गुलीयन बॅरी सिंड्रोम हा संसर्गजन्य आजार नसल्याने नागरिकांनी घाबरून जाऊ नये. शहरात खासगी रुग्णालयात आढळलेले रुग्ण शहरातील नाहीत. त्यांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे. या आजाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. संशयित रुग्ण आढळल्यास महापालिकेला कळवण्याच्या सूचना खासगी रुग्णालयांना देण्यात आल्या आहेत, असे महापालिकेचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले.

# बंद घर फोडून चोरट्यांनी ८ तोळे सोने व रोकड पळविली

## वसंत टेकडी परिसरातील घटना, अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर – बंद घराच्या दरवाजाचे कडी कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून, घरातील सामानाची उचकापाचक केली. कपाटातील कप्पा कशाचेतरी सहाय्याने उघडून आतील आठ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेल्याची घटना शिलाविहार, वसंत टेकडी परिसरात २२ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान घडली. याबाबत सुषमा किरण अहलुवालिया (रा.एव्हेन्यू अपार्टमेंट, शिलविहार, वसंत टेकडी) यांनी ३ फेब्रुवारीला तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या कुटुंबासह मुंबई येथे लग्न समारंभाकरीता गेल्या होत्या, त्या काळात त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कडी कुलूप तोडून, कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून, घरातील सामानाची उचकापाचक केली. कपाटातील कप्पा कशाचे तरी सहाय्याने उघडून आतील २० हजारांची रोकड, सहा तोळे वजनाचा सोन्याचा राणीहार, एक तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, एक तोळे वजनाचे कानातील सोन्याच्या तीन जोड्या असा ऐवज चोरून नेला. ही बाब अहलूवालिया हे गावावरून परत आल्यावर निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# चेन्नई दूरदर्शनवर अहिल्यानगर येथील ‘नताशा’चा भरतनाट्यम नृत्याविष्कार



नगर – नगरच्या कु.नताशा हिचा चेन्नई दूरदर्शन वर नृत्याचा विशेष कार्यक्रम नुकताच सादर झाला. कु. नताशाने गेल्या १३ वर्षांपासून चेन्नई येथे राहून भरतनाट्यम नृत्यात प्रावीण्य मिळवले आहे.

नगरमधून नृत्य विशारद झाल्यानंतर चेन्नई येथील ’कलाक्षेत्र फाउंडेशन’ या संस्थेमधून पदवी घेतली. त्यानंतर चेन्नईतील नृत्यगुरू शिजीत कृष्ण यांच्या सहृदय फाउंडेशन संस्थेत भरतनाट्यम नृत्य तसेच गायन, वादनाचे पुढील शिक्षण घेतले व गेली पाच वर्ष त्याच संस्थेत नृत्य अध्यापक म्हणून कार्यही करत आहे. तसेच ती नृत्याचे ऑनलाईन क्लासेस पण घेते, त्यात तिच्याकडून देश विदेशातील विद्यार्थी देखील भरतनाट्यमचे तंत्र शुद्ध शिक्षण घेत आहेत.

२८ जानेवारी रोजी तिचा चेन्नईच्या दूरदर्शन चॅनलवर एकल नृत्याविष्कार प्रसारित झाला व नंतर त्याच कार्यक्रमाचा दुसरा एपिसोड ३० जानेवारी रोजी प्रसारित झाला. गेल्या वर्षीही विद्या भवन मैलापुर येथे एकल नृत्याचे सादरीकरण झाले होते. कु. नताशाचे आजवर तिच्या गुरुंसमवेत चेन्नई, केरळ, बेंगलोर, गोवा, मुंबई, म्हैसूर, ऊटी, पुणे असे अनेक ठिकाणी नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत. नगरसारख्या शहरातून चेन्नईसारख्या मेट्रोसिटीमध्ये जाणे, आपल्या घरापासून लांब १३ वर्ष तिथे राहणे, तिथली भाषा शिकून घेऊन, तिथल्या संस्कृतीशी एकरूप होणे, तिथल्या कलेची, नृत्याची संस्कृती आत्मसात करून त्यात प्रावीण्य मिळवणे, सर्व गुरुजन, व समीक्षकांच्या पसंतीस उतरणे आणि आज नॅशनल दूरदर्शन वर नृत्याचा एकल नृत्याविष्कार सादर करणे इथपर्यंतचा हा प्रवास इतरांसाठी खूप प्रेरणादायी आहे. कु.नताशा ही नगरच्या गायिका व नृत्यांगना नृत्यगुरु नृत्यतपस्वी सौ.वर्षा पंडित तसेच नगरचे ज्येष्ठ संगीत समीक्षक चंद्रकांत पंडित यांची कन्या आहे.

नृत्याच्या क्षेत्रात तिने आमचेच नव्हे तर नगरचे नाव मोठे केले आहे असे प्रतिपादन विद्यालयाचे सह संचालक चंद्रकांत पंडित यांनी केले.

हे यश म्हणजे कलेचा ध्यास, संपूर्ण श्रध्देने केलेली अखंड नृत्य साधना उत्तम गुरूंचे मार्गदर्शन व आशीर्वाद याचेच फलित आहे. तिची प्रेरणा घेऊन तिच्यासारखं नृत्यच नाही तर अभिनय ही विद्यार्थ्यांनी शिकावा व आत्मसात करावा, अश्या भावना नृत्यतपस्वी सौ.वर्षा पंडित यांनी व्यक्त केल्या.



अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल लीग स्पर्धेत कराळे क्लब हाऊस संघाने विजेतेपद पटकाविले.

# अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल लीग स्पर्धेत ‘कराळे क्लब हाऊस’ने पटकाविले विजेतेपद

## ४५ सामन्यात नोंदवले गेले १५० गोल

नगर – अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल लीग स्पर्धेत सीनियर डिव्हिजनमधील १० संघानी सहभाग नोंदवला होता. ४५ सामने हे लीग पद्धतीने (ऑल प्ले ऑल) खेळवण्यात आले. यामध्ये १५० गोल नोंदवले गेले. कराळे क्लब हाऊस संघाने विजेतेपद तर सुमन इंटरप्राईजेस क्लबने उपविजेतेपद पटकाविले. विजेत्या संघात चषक २१ हजार रुपये रोख व उपविजेत्या संघास चषक १५ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस म्हणाले की, या स्पर्धेत २०० हून अधिक युवा खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे आणि स्पर्धात्मकतेचे प्रदर्शन केले. हे संपूर्ण वर्ष फुटबॉलसाठी अत्यंत उत्सावर्धक ठरणार आहे. जिल्ह्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी काळात बी. पी. हिवाळे करंडक यामध्ये शहरातील सर्वोत्तम ६ आणि राज्यभरातील १० संघ अशा १६ संघांचा सहभाग असणार आहे. अलेक्स करंडक आणि एस.के. करंडक यांसारख्या स्पर्धा नियोजित करण्यात आले असल्याची माहिती दिली. तसेच या स्पर्धेसाठी जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांचे पाठबळ आणि सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे उपाध्यक्ष खालील सय्यद, जोगासिंग मिन्हास, रिशपालसिंग परमार, व्हिक्टर जोसेफ, प्रदीप जाधव, राजू पाटोळे, जेव्हिअर स्वामी, रणबीरसिंग परमार, रमेश परदेशी, भाऊ भिंगारदिवे, अभिषेक सोनवणे, वैभव मनोदिया, सुमित राठोड आणि जिल्हा फुटबॉल संघटनेच्या पंचांचे योगदान लाभले.

निकाल पुढीलप्रमाणे:–विजयी– कराले क्लब हाऊस, उपविजयी– सुमन इंटरप्राईजेस फुटबॉल क्लब, अनुक्रमे फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लब, फ्रेंड्स स्पोर्ट्स अकॅडमी, फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी, सिटी क्लब, गुलमोहर स्पोर्ट्स क्लब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फुटबॉल क्लब, जहारवीर फुटबॉल क्लब, नमोह फुटबॉल क्लब यांनी क्रमांक पटकाविले.

वैयक्तिक पारितोषिके:– सर्वोत्कृष्ट गोल रक्षक– यश कोठाळे (कराळे क्लब हाऊस), सर्वोत्कृष्ट खेळाडू– प्रकाश कनोजिया (सुमन इंटरप्राईजेस फुटबॉल क्लब), सर्वोत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडू– शुभंकर सावंत (गुलमोहर स्पोर्टस् क्लब).

# प्रमोदसुधाजींच्या दीक्षादिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त आनंदधाममध्ये भक्तामर मंडळाचा महाकुंभ



प्रमोदसुधाजी म.सा. यांच्या दीक्षादिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त येथील आनंदधाममध्ये भक्तामर मंडळाचा महाकुंभ भक्तीपूर्ण वातावरणात झाला.

नगर – गुरूमाऊली प्रमोदसुधाजी म.सा. यांच्या दीक्षादिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त येथील आनंदधाममध्ये भक्तामर मंडळाचा महाकुंभ भक्तीपूर्ण वातावरणात झाला. भक्तामर स्तोत्राच्या उच्चारणाने आनंदधाममधील वातावरण मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध ५४ भागांमधून ११०० च्या वर महिला आल्या होत्या.

आचार्य सम्राट आनंदऋषीजी म.सा.यांच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या आनंदधाममधील या सोहळ्यास प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. आणि प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांचे मार्गदर्शन लाभले. अलोकऋषीजी, सत्यप्रभाजी, दिव्यदर्शनाजी यांची मोलाची साथ लाभली. उज्वल साध्वी परिवाराच्या विश्वदर्शनाजी आणि पुनितदर्शनाजी यांनी अथक परिश्रम घेत नियोजन केले.

जैन धर्माचा ध्वज फडकावून या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. साध्वी विश्वदर्शनाजी यांनी मनोगत व्यक्त करताना नारी शक्ति धर्माचा आणि संसाराचा समतोल समर्थपणे सांभाळते. सामुहिक जपाच्या दिव्य शक्तीचा आनंद प्रत्येक महिला अनूभवत होती. एकत्रितपणे सामुहिक जप केल्याने विश्वशांती, राष्ट्रशांती लाभून आत्मानंद प्राप्त होतो.

नो कमेंटस्, नो कंप्लेट, नो कंपेरीझन या त्रिसूत्रीचा गुरू प्रसाद प्रवचनाच्या माध्यमातून उपस्थित महिलांना देण्यात आला. वीरस्तुतीचे पठण करताना प्रत्येकीला दिव्य शक्तीची अनुभूती मिळाली. साध्वी पुनितदर्शनाजींनी प्रश्नमंच स्पर्धा घेऊन उत्साह वृध्दींगत केला. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ आणि तिलोकरत्न धार्मिक परिक्षा बोर्ड यांचे विशेष सहकार्य लाभले. कुंदनऋषीजी म.सा. चे आदर्शऋषिजी यांच्या आशीर्वादाने आणि गुरूदेवांच्या मंगलपाठाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

सौ.ज्योती गांधी (लोणी), सौ. मनिषा मुनोत, सौ.सपना पटवा ग्रुप, सौ. कोमल बोरा ग्रुप वर्धमान महिला मंडळ आदि महिलांनी कार्यक्रम नियोजनात योगदान दिले. यावेळी महिलांमधून ७५ लकी ड्रॉ काढण्यात आले. जय आनंद गुरू भक्त मंडळाने गौतम प्रसादीची सुरेख व्यवस्था केली होती. सामुहिक जपाच्या दिव्य शक्तीचा आनंद प्रत्येक महिला अनुभवत होती.

एकत्रितपणे सामुहिक जप केल्याने विश्वशांती, राष्ट्रशांती लाभून आत्मानंद प्राप्त होतो.

# सौ. साधनाताई कुकडे – कुलकर्णी यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान



ब्राह्मण महिला मंचच्या वतीने अहिल्यानगर येथील शिक्षिका सौ.साधना प्रसाद कुकडे – कुलकर्णी यांना राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार उपमहापौर संजय जोशी, बाजीराव धर्माधिकारी, विश्वजित देशपांडे, अमृता पालोदकर, विजयाताई कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नगर – छत्रपती संभाजीनगर येथील ब्राह्मण महिला मंचच्यावतीने अहिल्यानगर येथील समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या आनंदवनभुवन पूर्व प्राथमिक बालवाडी विभागाच्या शिक्षिका सौ.साधना प्रसाद कुकडे – कुलकर्णी यांना (महाराष्ट्रातून) राज्य स्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर येथील आयोजित कार्यक्रमात उपमहापौर संजय जोशी, अमृत विकासाचे अध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, अमृत विकास सल्लागार विश्वजित देशपांडे, अमृता पालोदकर, ब्राह्मण महिला मंचच्या अध्यक्षा विजयाताई कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काचे स्वरूप सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे आहे.

या पुरस्कार प्राप्तीबद्दल कुकडे यांचे सावेडी भागातील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.धनश्री गुंफेकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व शिक्षक वृंद यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.



शिलाविहार येथे गोंदवलेकर महाराज मंदिरात योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या पादुकांचे स्वागत करण्यात आले. (छाया – विजय मते)

# योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या पादुकांचे गोंदवलेकर महाराज मंदिरात पूजन-दर्शन सोहळा

नगर – संभाजीनगर येथील योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या पादुकांचे अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात शिलाविहार येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात स्वागत करून पूजन व दर्शन सोहळा पार पडला.

गोंदवलेकर महाराज यांच्या जन्मोत्सवा–निमित्त येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. वसंत पंचमी निमित्त योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या चरण पादुकांचे सावेडी उपनगरात सर्वत्र स्वागत होऊन पूजन करून दर्शनाचा लाभ भाविकांनी घेतला.

या पादुकांचे विधिवत पूजन सौ.रूपा व प्रसाद देवा यांनी केले. यावेळी अंबरीश महाराज, अनिरुध्द महाराज, भागवताचार्य नंदकुमार रामदासी, डॉ.अनिकेत घोटणकर, सुंदरदास रिंगणे, सौ.रेखाताई रिंगणे, अशोक मुळे, राम विधाते, राहुल लिमये उपस्थित होते. पादुकांच्या पूजन सोहळ्या बरोबरच ४ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथील किस्त गल्लीतील श्री बालाजी मंदिरात सामुदायिक उपासक सोहळा सायंकाळी ६ ते ८ होणार आहे. शहरवासीयांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री हरिहर सद्गुरु शक्ती पीठाने केले आहे. या पादुकांचे पूजन झाल्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

# हिंद सेवा मंडळाची वार्षिक सभा उत्साहात : सर्व विषय एकमताने मंजूर



हिंद सेवा मंडळाच्या झेलल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक. समवेत सचिव संजय जोशी व सर्व संचालक.

नगर – हिंद सेवा मंडळ शैक्षणीक संस्थेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेस मानद सचिव संजय जोशी यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक प्रतिनिधी व जिल्ह्यातून आलेले सभासद उपस्थित होते. विषय पत्रिकेवरील सर्व विषय उपस्थित सभासदांनी एकमताने मंजूर केले.

अजेंड्यावरील विषयांवर चर्चा सुरु असतानाच संस्थेचे सभासद संजय घुले यांनी संस्थेच्या सभासदांना भाडोत्री सभासद असे संबोधल्याने सभेत थोडा वेळ गोंधळ उडाला. यावेळी संतप्त झालेल्या सभासदांनी संजय घुले यांना चांगलेच धारेवर धरले. सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, ईश्वर बोरा, प्रा.स्मिता भुसे, संजय छल्लारे व श्रीरामपूरचे माजी नगराध्यक्ष रवींद्र गुलाटी यांनी संजय घुले यांचे सभासदत्व रद्द करण्याची मागणी केली. त्यामुळे संजय घुले यांनी ताबडतोब सभेची जाहीर माफी मागितली. त्यांनतर सभेचे कामकाज पुन्हा सुरळीत झाले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी सभासदांच्या प्रश्नांना समाधान कारक उत्तरे दिल्याने ही सभा साधकबाधक चर्चने झाली.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, हिंद सेवा मंडळ शैक्षणिक क्षेत्रात चौफेर प्रगती करत आहे. यामध्ये संस्थेच्या संचालक, सभासद, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. संस्थेचा प्रगतीचा चढता आलेख वार्षिक सभेत मांडताना मोठे समाधान वाटत आहे, असे सांगून विषय पत्रिकेवरील सर्व विषय सभेसमोर मंजुरीसाठी मांडले. उपस्थित सभासदांनी सर्व विषय एकमताने मंजूर केले.

ब्रिजलाल सारडा म्हणाले, गेल्या १०० वर्षांपासून संस्था नि:स्वार्थ भावनेने शैक्षणिक कार्य करत आहेत. अनेक अडचणींवर मात करत संस्था भक्कम पायावर उभी आहे. सभासदांनी या कार्यास अशीच साथ द्यावी, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात संजय जोशी म्हणाले, ऐतिहासिक व वैभवशाली शैक्षणिक परंपरा लाभलेल्या हिंद सेवा मंडळाच्या शतक महोत्सवी वर्षाची उत्साहात सांगता झाली आहे. येणाऱ्या काळात नव्या वास्तू उभारून अधिक अद्यावत व डीजीटल शैक्षणिक सुविधा सर्व शाळा व महाविद्यालयांमधून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय संस्थेने घेतला आहे. यासाठी मोठ्याप्रमाणात निधीची आवश्यकता भासणार आहे. इंग्रजी माध्यमांच्या स्पर्धेतही संस्थेच्या मराठी शाळा उत्तम प्रगती व कामगिरी करत आहे. यामध्ये शिक्षकांचे योगदान आहे. सर्व सभासदांनी या शैक्षणिक कार्यास हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

या सभेत संस्थेच्या उपाध्यक्षपदी संगीता ॲबट, सागर गांधी, प्रा.शरद गोखले व रवींद्र गुलाटी या सभासदांची नियुक्ती करून चौघांचा सत्कार करण्यात आला. सतीश लोढा यांची राष्ट्रीय जैन कॉन्फरन्सच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल, तसेच ज्येष्ठ संचालक रणजीत श्रीगोड व ईश्वर बोरा यांचा सन्मान संस्थेच्या वतीने करणात आला. यावेळी हिंद सेवा मंडळाच्या सर्व शाळांचे चेअरमन, शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# आरोग्य, स्वसंरक्षण आणि कायद्याचे ज्ञान वाटत जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम



अहिल्यानगरमध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव यांच्या वतीने पारंपरिक हळदी–कुंकू समारंभ अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

नगर – अहिल्यानगरमध्ये जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव यांच्या वतीने पारंपरिक हळदी–कुंकू समारंभ अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यात केवळ सणाचा आनंदच नव्हे तर महिलांना आरोग्य, स्वसंरक्षण व कायदे याबाबत जागरूक करण्यावर भर देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेस वंदन व दीपप्रज्वलनाने झाली. अध्यक्षस्थानी ब्रिगेड प्रदेश कार्याध्यक्षा राजश्री शितोळे होत्या, तर प्रदेश सह संघटक डॉ. कल्पना ठुबे यांनी जिजाऊ वंदना सादर केली. सुरभी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. सुलभा पवार यांनी महिलांच्या आरोग्यासंदर्भात माहिती दिली तर क्रिमिनल लॉयर ॲड. स्नेहा लोखंडे यांनी महिलांच्या हक्क आणि कायद्यांवर मार्गदर्शन केले.

या वेळी शहीद जवानांच्या पत्नी आणि एकल महिलांचा सन्मान करण्यात आला.

स्त्रिया केवळ चूल–मूलापुरत्या मर्यादित न राहता यशाची वाटचाल करावी. बदलत्या जगात महिलांनी देखील काळानुसार बदलले पाहिजे. स्वतःला कमी न लेखता आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वेगवेगळ्या क्षेत्रातील संधी महिलांसाठी उपलब्ध आहेत. आवश्यक ते कौशल्य मिळवून या संधी मिळवण्याचा महिलांनी प्रयत्न केला पाहिजे. पारंपरिक पद्धतीनेविचार करणे सोडून बदलत्या काळानुरूप विचार करण्याची आवश्यकता असल्याचे ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सांगितले.


राजश्रीताई शितोळे यांनी जिजाऊ ब्रिगेडचं महिलांच्या जीवनात कसं महत्त्वाचं स्थान आहे हे नमूद करताना म्हणाल्या की, आधुनिक काळाबरोबर चालताना बाहेरील जगात वावरताना राजमाता जिजाऊची प्रेरणा आणि ऊर्जा आपल्या सोबत असेल तर आयुष्याची खडतर वाट सुकर होते. हळदी कुंकू सारख्या समारंभात सर्व क्षेत्रातील व जाती धर्माच्या महिलांना सहभागी करून आरोग्य संरक्षण व कायदे याविषयी जागृतता निर्माण करण्यावर भर देणाऱ्या या समारंभाचे आयोजन करणाऱ्या नूतन जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव यांचे कौतुक केले.

यावेळी रेशमा आठरे, माया जगताप, चंद्रकला कळमकर, अनिता काळे, प्राची कळमकर, करुना काळे, सुरेखा चेमटे, पजया भोकरे, उज्वला कळमकर, उर्मिला मुळे, डॉ. केवळ ज्योती पाटील, संगीता धामणे, अर्चना अनभुले, वर्षा दिपिका, स्वाती राजेभोसले, सुरेखाताई भोसले, नलिनी गायकवाड, भारती औटी, उर्मिला कदम, उषा काळे, ॲड.अनुराधा येवले, कविता दरंदले आदीसह इतर विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कार्याध्यक्षा योगिता कर्डिले यांनी मानले.

महिलांसाठी ब्रिगेडमध्ये सदस्य नोंदणी सुरू असून, इच्छुकांनी ॲड. स्वाती जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# स्वामिनी नगरकर हिला संगीत विशारद पदवी प्राप्त

## अलंकार परीक्षेत डॉ.ऋषिकेश कुलकर्णी आणि अनुजा कुलकर्णी यांचे सुयश



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर २०२४ च्या संगीत परीक्षेत श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. अहमदनगर (९९) या केंद्रात अन्वय परदेशी, शार्दुल खोल्लम, शौनक कुलकर्णी, गौरी बिडकर, स्वामिनी नगरकर, डॉ.ऋषिकेश कुलकर्णी हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गायनात व हार्मोनियम वादनात केंद्रात प्रथम आले आहेत.

स्वामिनी नगरकर या विद्यार्थीनीनी प्रथम श्रेणीसह संगीत विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे – प्रारंभिक – ऋत्वीका कुलकर्णी, तामिरा तेजस्विनी, ओवी सोनवणे, श्रिराज कराळे, अनुज भालेराव, पियूष सानप, अंशुमन वाणे, अलंकृता जगताप, कृष्णा साखला, शांभवी साखला, गिरीश दैतुल, मयुरेश मुंगी

प्रवेशिका प्रथम – अन्वय परदेशी, स्वानंदी देशमुख, निर्मिती गवळी, राजवीर काशीद, निषाद पानसरे, अस्मी खामीतकर, सोहम देशमुख, सौम्या देशमुख, स्मिता देशमुख, शराली काळे, रोहित तांबोळी

प्रवेशिका पूर्ण – शार्दुल खोल्लम, अमृता औटी, अपूर्वा जोगदे, सोहम भंडारी, आराध्या गाडळकर, उर्वी दैवज्ञ, राशी मंडलेचा, आर्या कावळे, वैष्णवी पटवा, प्रीती गांधी, आरोही बेडेकर, सुरेश पवार, अलका केळकर, जय बोरा,

मध्यमा पूर्ण : शौनक कुलकर्णी, स्वानंद बांदल, शिल्पा मुळगुंद, वैष्णवी मोरे, गुंजन गोले., विशारद प्रथम : गौरी बिडकर., विशारद पूर्ण : स्वामिनी नगरकर., अलंकार प्रथम : डॉ.ऋषिकेश कुलकर्णी, अनुजा कुलकर्णी

सर्व विद्यार्थ्यांना पुष्पा औटी, डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## वरद शिंदे यांचे तबला परीक्षेत यश



नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने (केंद्र क्रमांक ९९) नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२४ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेत तबला या विषयात आरोही संगीत विद्यालयाचे विद्यार्थी प्रथम तसेच विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले.

विद्यालयाने १०० % निकालाची परंपरा कायम ठेवली. वरद शिंदे याने विशेष योग्यता मिळवत केंद्रात प्रथम येण्याचा मान पटकावला. त्याला आरोही संगीत विद्यालयाचे अध्यक्ष स्वप्निल खराडे सर (तबला विशारद) तसेच सौ. शितल खराडे (इ म्यूजिक) यांचे मार्गदर्शन लाभले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. १४/८ व १५/५ व १ व १५/५/३ व १५/५/४ हिस्सा क्र. १४ (ॲमिनीटी) याचे क्षेत्रफळ ५.७७.२१ चौ.मी. सदर प्लॉट मंजुर नकाशा नुसार याची चतु:सिमा खालीलप्रमाणे – **पूर्वेस - प्लॉट नं. २० व ओपन स्पेस, दक्षिणेस - ६ मी रोड, पश्चिमेस - सर्व्हे नं. १३, उत्तरेस - सर्व्हे नं. १४/७**

हा संपूर्ण प्लॉट याचे विद्यमान मालक १. संगिता प्रशांत धुमाळ २. सुमन शिवाजी आमटे ३. उमेश शिवाजी आमटे यांचे नावावर आहे.

सदर मिळकतीचे विक्री करण्याचे त्यांना अधिकार आहेत. सदर मिळकत त्यांनी विक्रीस काढली व आमचे पक्षकारांबरोबर त्याबाबत बोलणी होऊन तसा व्यवहार ठरला आहे व ईसाराची रक्कम स्विकारली आहे. त्याप्रमाणे लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणार यांचे म्हणणे आहे. तथापि, सदर मिळकतीवर ईतर कोणाचेही कोणतेही, हक्क, दान, बक्षिस, लिज, साठेखत, हक्कसोडपत्र, अदलाबदल लेख, पोटगी, गहाणखत, ॲटेचमेंट, जप्ती, लिलाव, विसाराची रक्कम, इजमेंट्री राईटस् अगर इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची माहिती संपूर्ण कागदपत्रांसह, खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आणून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/तक्रार न आल्यास वरील मिळकत निर्वेध व निजोखमी आहे व त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व बोजा नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून व गृहीत धरुन, आमचे पक्षकार सदर खरेदीचा व्यवहार लवकर पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

कळावे,

दि. ०४/०२/२०२५

शॉप नं. ५, सावित्रीबाई व्यापारी संकुल,
तहसिल ऑफिस समोर, सावेडी, अहिल्यानगर
मो. ९४२२२२२२९५

**युवराज भानुदास पोटे**
ॲडव्होकेट



## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पिंपळगाव वाघाच्या पै. सौरभ शिंदे याला कास्यपदक

नगर – पिंपळगाव वाघा (ता. नगर) येथील पै. सौरभ पोपट शिंदे या मल्लाने अहिल्यानगर येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत माती विभागात ७४ किलो वजन गटामध्ये कास्यपदक पटकाविले. पै. शिंदे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन नगर जिल्ह्यासाठी पदक मिळवून दिले. पै. सौरभ शिंदे सध्या गुरु हनुमान कुस्ती संकुल अंबिलवाडी येथे पै. विकास सासवडे व पै. सखाराम गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निमूलन संघर्ष समितीच्या अहिल्यानगर महिला जिल्हाध्यक्षपदी मेघाताई डहाळे

नगर – मेघाताई डहाळे यांना पत्राद्वारे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष (महिला विभाग) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.



राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील, खंडापूरकर बाबा व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा ॲड. राणीताई स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती देण्यात आली.

# पाऊले चालती सहकाराची वाट...

आपला अहिल्यानगर जिल्हा एक अनोखा जिल्हा. साधु–संतांच्या सान्निध्याने पावन झालेल्या आपल्या जिल्ह्यात ऐतिहासिक पाऊलांचेही भक्कम ठसे उमटले आहेत.

जगासाठी 'जो जे वांच्छिल तो ते लाहो' असं पसायदान माऊली ज्ञानेश्वरांनी मागितले, त्या जिल्ह्यात 'एकमेका साह्य करू' या संकल्पनेचाही पुरस्कार मोठ्या प्रमाणात करण्यात आलेला आहे.



वसंत लोढा | काका कोयटे

आशियातील सर्वप्रथम सहकारी साखर कारखाना पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी काढला. स्वातंत्र्यानंतर आर्थिक उन्नती, देवाण–घेवाण, सर्वसामान्यांच्या बँकींग व कर्जविषयक गरजांच्या पूर्ततेसाठी सहकारी बँका आल्या आणि त्याहीपेक्षा वेगवान गतीने पतसंस्थांची चळवळ उभी राहिली.

महाराष्ट्रात सहकारी पतसंस्था इतक्या भक्कमपणे वाढल्या की राज्याच्या औद्योगिक, व्यावसायिक वाढीसाठी त्यांनीही मोठा वाटा उचलला आहे. राष्ट्रीयीकरणानंतर बँका ग्राऊंडरुट पातळीवर पूर्ण सहकार्य करू शकत नव्हत्या (किंवा कर्मचाऱ्यांचे १००% सहकार्य नव्हते!) त्यातूनच पुढे सहकारी बँका आणि त्यानंतर विस्तृत प्रमाणात सहकारी पतसंस्था निर्माण झाल्या, विस्तारल्या, फोफावल्या.

जसजशी चळवळ, संस्था वाढतात तसतशा काही ठिकाणी स्वार्थांध अपप्रवृत्तींमुळे बदनामी, नुकसान तोटे होतात. सह. पतसंस्थाही त्याला अपवाद नाहीत. किंबहुना शैक्षणिक क्षेत्रासारखे काही जण सहकारात संस्थेच्या पैशावर मजा करू लागले, मोठे होऊ लागले. त्यांनी राजकीय शक्तींचा दुरुपयोग, गैरवापर करुन भ्रष्टाचार केले आणि सभासद अन् ठेवीदारांचे मोठे नुकसान केले.

या स्थित्यंतरास या संचालक, पदाधिकारी कर्मचाऱ्यांसह शासनाचा योग्य धाक, नियंत्रण नसणे दुर्दैवाचे ठरले. आपल्या नगर जिल्ह्यापुरता विचार केल्यास काही सहकारी पतसंस्था (बँका सुद्धा) संचालकांच्या भ्रष्टाचार व नियोजनशुन्य कारभारामुळे डबघाईस आल्या. बुडाल्या. या सर्व बाबींमुळे समाजहितैषी व सहकाराचे खरे वारकरी असणाऱ्यांनी एकत्र येवून पतसंस्थांसाठी या संस्था, सभासद, ठेवीदार यांच्या सुरक्षिततेसाठी, नियंत्रण व नियोजनासाठी तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवर फेडरेशन स्थापन केल्या. अर्थातच जिल्हा व राज्य पातळीवरील संस्था (फेडरेशन) अत्यंत महत्त्वाच्या व निर्णायक आहेत.

युनोने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केल्याने महा.शासन सहकार विभाग, महा.राज्य सह. पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डीच्या पावनभूमीत आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन केले आहे. सहकाराच्या या कुंभमेळ्यातून सहकाराच्या मूलमंत्राचे व प्रामाणिक उद्देशांचे अमृत सिंचन होऊन सहकाराचा सर्वांगिण विकास व्हावा या शुभकामना.

अहिल्यानगरवासियांच्या दृष्टीने या पतसंस्था चळवळीत मोठी आनंदाची गोष्ट म्हणजे नेतृत्वाचे तीन एक्के ठरलेले. राष्ट्रीय स्तरावर पोहोचलेले काकासाहेब कोयटे, राहुरीचे सुरेश वाबळे व आपल्या शहराचे वसंत लोढा यांनी सक्षमपणे या चळवळीसह संपूर्ण आंतरराष्ट्रीय परिषदेचे नेतृत्व करीत आहेत.

एकमेका साह्य करू या उक्तीप्रमाणे पतसंस्थांविषयी सभासद, ठेवीदारांना विश्वास देण्याबरोबरच, कर्मचाऱ्यांत आत्मियता, आस्था वाढवून संचालकांच्या सामूहिक दायित्त्वावर ते सर्व कार्य करीत आहे.

महाराष्ट्र शासनाचा सहकार विभाग त्यांना पूर्ण पाठींबा व सहकार्य देत आहेत. वरिष्ठ नागरिक, महिलांच्या बचत गटांसह, ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्था सक्षमपणे उभ्या राहणे खूपच आवश्यक वाटते. म्हणूनच शहरात सहकार दिंडीच्या माध्यमातून वातावरण निर्मिती होत आहे. यानिमित्त विविध पतसंस्थांचे चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांना विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. या सर्वांना आपणही शुभेच्छा देऊ या.

**– किशोर गांधी**
(दिशान फिचर्स)
(लेखकास सहकार व बँकींग मधील ३५ वर्षांचा अनुभव आहे)















## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **सौ.मीना चेतन भट्ट**, रा. गोकुळ नगर भिवंडी यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज, अव्वल जप्ती, इजमेंट इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** –

डि।। अहमदनगर सब डि।। व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे केडगाव येथील सर्व्हे नं. ३९२/७ मधील प्लॉट नं. ११ याचे एकुण क्षेत्र १२०.०० चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट व प्लॉट नं. १२ याचे एकुण क्षेत्र १२०.०० चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट**

यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे :– रेकॉर्ड प्रमाणे

येणेप्रमाणे चतु: सिमापुर्वक प्लॉट मिळकत तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

अहमदनगर
दिनांक :– ०४/०२/२०२५

**ॲड. मोहित कांतीलाल बोरा,**
ऑफिस नं. ७ड, साक्षी चेंबर्स, जुन्या कोर्टा जवळ,
अहमदनगर. मो. नं. ९८८१९६६२२१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **अंजुम हन्नान सय्यद, सना आकिफ शेख, खानम मोहम्मद हुसेन खान,** रा. माळीवाडा अहमदनगर यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज, अव्वल जप्ती, इजमेंट इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** –

डि।। अहमदनगर सब डि।। व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे केडगाव येथील सर्व्हे नं. ३९२/७ मधील प्लॉट नं. १३ याचे एकुण क्षेत्र १२०.०० चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट व प्लॉट नं. १४ याचे एकुण क्षेत्र १२०.०० चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट**

यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे :– रेकॉर्ड प्रमाणे

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक प्लॉट मिळकत तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

अहमदनगर
दिनांक :– ०४/०२/२०२५

**ॲड. मोहित कांतीलाल बोरा,**
ऑफिस नं. ७ड, साक्षी चेंबर्स, जुन्या कोर्टा जवळ,
अहमदनगर. मो. नं. ९८८१९६६२२१

"हर काम देश के नाम"

## अहमदनगर छावनी परिषद

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहमदनगर – ४१४००२
Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

पत्र सं. अहम/राजस्व/टी–१/त्रि. कर निर्धारण/२०२४–२५/ दि. ३/२/२०२५

### जाहीर नोटीस

अहमदनगर छावनी क्षेत्र के सभी संपत्ति धारकों को सूचित किया जाता है कि, सभी संपत्तियों का त्रैवार्षिक मूल्यांकन मूल्य २०२५–२०२८ (**Triennial Assessment**) इस साल के लिए किया जा रहा है। इसलिए छावणी परिषद ने संशोधित सूची का निर्माण किया है, अपनी संपत्ति का कर योग्य मूल्य अवलोकनार्थ छावणी परिषद कार्यालय में कार्यालय समय के दौरान यह नोटिस प्रकाशन की तारीख से तीस (३०) दिनों के लिए यह संशोधित सूची उपलब्ध रहेगी।

जो संपत्ति धारक अपनी संपत्ति के उक्त त्रैवार्षिक मूल्यांकन से सहमत नहीं हैं ऐसे संपत्ति धारक इस सार्वजनिक सूचना के प्रकाशन से तीस (३०) दिनों के भीतर अपनी आपत्ति विवरण सहित लिखित रूप में छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर में जमा करे। कृपया ध्यान दें कि समय सीमा समाप्ती के पश्चयात, प्राप्त आपत्तियों पर किसी भी प्रकार से विचार नहीं किया जाएगा।

प्राप्त आपत्तियों को व्यक्तिगत रूप से सुना जाएगा और उक्त संशोधित त्रैवार्षिक मूल्यांकन मूल्यों को अंतिम मंजूरी दी जाएगी। सभी संपत्ति धारकों को सूचित किया जाता है कि अंतिम मंजूरी उपरांत कर योग्य मूल्य में किसी भी तरह की सुधारणा नहीं कि जाएगी।

sd/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**छावणी परिषद, अहमदनगर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिल यांच्याबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०४/०२/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे सावेडी** येथील प्लॉटसह बांधकाम केलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**सर्व्हे नं. ९४ / ई मधील प्लॉट नं. ७६ चे एकुण क्षेत्र ३१५.०० चौ. मी. व त्यावरील लोडबेअरींगमधील एकुण बांधकाम क्षेत्र १२५.७२ चौ. मी. ही प्लॉटसह बांधकाम केलेली संपुर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – बंद रस्ता व खुली जागा | दक्षिणेस – खुली जागा (ओपन स्पेस)
पश्चिमेस – प्लॉट नं. ७५ | उत्तरेस – ९.०० मीटर रुंदीचा रस्ता

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक** –

**१. अमृता विशाल जिंदीयाल उर्फ अम्रिता विशालकुमार जंडीयाल,**
रा. सर्व्हे नं. ७७, कौशल्या बंगलो, अंपग स्कुल समोर, वानवाडी गांव, पुणे– ४११०४०.
**२. निता मनिष ओबेरॉय, रा. सावेडी, अहिल्यानगर**
**३. निशा मनित भल्ला उर्फ निशा मानीत भल्ला**
रा. फ्लॅट नं. ५, अपसरा बिल्डींग, विर सावरकर मार्ग, वसंत टेकडी, शिला विहार, सावेडी, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. उदय शिवाजी कराळे रा. सावेडीगांव, सावेडी, अहमदनगर व श्री. किशोर सोन्याबापू वाकळे रा. सावेडी, अहमदनगर** यांच्या यांच्या एकत्रित खरेदी मालकी वहिवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकत आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसबंध अगर कब्जा नाही अशी मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे आत** लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

डिस्ट्रीक्ट अहमदनगर, सब डिस्ट्रीक्ट ता. नगर पैकी, येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. १२/४/१२/५ब चे एकूण क्षेत्र ० हे ०९ आर** ही संपूर्ण मिळकत.

**यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे** –

पूर्वेस : १५.०० मी. रुंदीचा डी. पी. रस्ता
दक्षिणेस : सर्व्हे नं. ४
पश्चिमेस : सर्व्हे नं. ९/२/१ब/२
उत्तरेस : सर्व्हे नं. १२/४/१२/५अ मोहनलाल मानधना यांची मिळकत

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत त्यामधील, तदूंगभुत वस्तुंसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता.

अहमदनगर
ता. ०४/०२/२०२५

**ॲड आनंद आर. फिरोदीया**
पत्ता– ११९, अंबर प्लाझा ए बिल्डींग, एस.टी. स्टॅण्ड जवळ,
अहमदनगर. मो. ९८९०६१५२५३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक **१. श्री. प्रमोद उध्दव रासने, रा. श्रीराम कॉलनी, नगर पुणे रोड, अहमदनगर २. श्री. प्रविण मोतीचंद डोरले, रा. धानीवबाग, पेल्हार, पालघर, ३. दिपा दिलीप रासने, ४. निता दिलीप रासने, ५. सोनाली दिलीप रासने, ६. सुनंदा दिलीप रासने नं. ३ ते ६ रा. विनायक नगर, गणपती मंदीरजवळ, भागवत धाम, अहमदनगर, ७. हेमा अनिल रासने, ८. ऐश्वर्या अनिल रासने, ९. श्रावणी अनिल रासने नं. ७ ते ९ रा. श्रीराम कॉलनी, केडगांव, अहमदनगर** यांच्या एकत्रित मालकी वहिवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारून सदर मिळकत आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसंबंध अगर कब्जा नाही अशी मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे आत** लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

डिस्ट्रीक्ट अहमदनगर, सब डिस्ट्रीक्ट ता. नगर पैकी, येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ९/२/१ब / २ ( याचा जुना सर्व्हे नं. ६/२/१ब) चे एकूण क्षेत्र ० हे ३२ आर ही मंजूर विकास नकाशाप्रमाणे हॉस्पीटल करिता आरक्षित** असलेली संपूर्ण मिळकत. सदर सर्व्हे नं. ९/२/१ब/२ च्या चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

**यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे** –

पूर्वेस : सर्व्हे नं. १२/४/१२/५ब उदय कराळे व किशोर वाकळे यांची मिळकत व सर्व्हे नं. १२/४/१२/५ अ मोहनलाल मानधना यांची मिळकत
दक्षिणेस : लागु सर्व्हे नं. ४
पश्चिमेस : सर्व्हे नं. ९/२/१ब/१
उत्तरेस : सर्व्हे नं. ९/२/१अ पैकी प्लॉट नं. १७ ते २२

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत त्यामधील, तद्ंगभुत वस्तुंसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखुन न ठेविता.

अहमदनगर
ता. ०४/०२/२०२५

**ॲड आनंद आर. फिरोदीया**
पत्ता– ११९, अंबर प्लाझा ए बिल्डींग, एस.टी. स्टॅण्ड जवळ,
अहमदनगर. मो. ९८९०६१५२५३






## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **सईद युसुफ पटेल शेख,** रा. ८९, सि. आय. व्ही. हौसिंग सोसायटी, दर्गादायरा रस्ता, मुकुंदनगर, अहमदनगर, यांचे मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असुन लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहमदनगर सब. डि. ता. नगर पैकी अहमदनगर येथील महानगरपालिका हद्दीतील मौजे **भिंगार** येथील सि. आय. व्ही. कॉलनी भागातील प्लॉटसह बांधकाम केलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | चौ. मीटर |
|---|---|---|
| ३२५/१/३२५/२अ | ८९ ब | १६३.७९ |

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेल्या तळमजल्यावरील एक किचन, एक हॉल, दोन बेडरुम, संडास बाथरूम व पहिल्या मजल्यावरील दोन बेडरुम व एक हॉल, संडास बाथरुमसह असे एकुण बांधकाम क्षेत्र १६००.०० चौ. फुट असून यातील इले. लाईट मीटर व पाण्याचे नळ कनेक्शनसह आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.

**यासी चतु:सिमा**–

पुर्वेस – प्लॉट नं. ८५, | दक्षिणेस – प्लॉट नं. ९०
पश्चिमेस – प्लॉट नं. ८९ अ पैकी भाग, | उत्तरेस – १८.०० मीटर रुंदीचा रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखून न ठेविता.

अहमदनगर
ता. ०४/०२/२०२५

**ॲड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर
मो.नं. ९२७०४६४६००

**ॲड. मोहसीन आय. शेख**
**ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८






मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

**पुण्यातल्या कोथरूडमधल्या तुषार पायगुडेची ही कथा आहे. चांगल्या ठिकाणी घेतलेला कामाचा अनुभव आणि वाचनाच्या आवडीमुळे सुशिक्षीत आणि प्रतिष्ठीत लोकांशी संवाद साधण्याचं कौशल्य तुषारला प्राप्त झालं. ज्यातून ५०० ग्राहकांचा पक्का बेस त्याच्याकडे तयार झाला. अल्पावधीत तुषारने केलेली प्रगती बघितली की गाड्यांबरोबर माणसांच्या मनाचीही दुरूस्ती आणि सर्व्हिसिंग करण्याचं कौशल्य तुषारला चांगलंच साधलं आहे असं वाटतं.**

# मेकॅनिक ते सोळा जणांच्या टिमचा बॉस

अचिव्हर

तुषार गॅरेजच्या लाइनमध्ये जाणार हे तो दहावी झाल्यावरचं पक्कं झालं होतं. आयटीआयचा कोर्स पूर्ण करून शाहू कॉलेजमध्ये टाटांचं इंडिका आणि सफारी गाड्यांचं वर्कशॉप होतं, तिथे तो ट्रेनी म्हणून जॉइन झाला. त्यानंतर वर्षभर ५१२ आर्मीबेस्ड वर्क शॉपमध्ये रणगाडे दुरूस्तीचं काम त्याने केलं. २००२ मध्ये मारुतीची ऑथोराइज्ड डीलरशिप असलेल्या साई सर्व्हिसला वॉशिंग टेक्निशियन्सच्या हाताखाली तो ट्रेनी म्हणून जॉइन झाला. आणि पुढच्या दहा वर्षांत मेकॅनिक, सीनियर मेकॅनिक, सुपरवायझर, ॲडव्हाईजर अशी बढती त्याला मिळत गेली. कामात पूर्णत: पारंगत झाल्यावर २०१२ मध्ये त्याने स्वत:चं वर्क शॉप सुरू करायचं ठरवलं. कोथरूडमध्ये सागरचं गाड्यांचं वॉशिंग सेंटर होतं. तिथेच तुषारने ५०-६० हजार रुपयांचं टूल कीट घेऊन भागीदारीत



वर्कशॉप सुरू केलं. जागा स्वच्छ करण्यापासून सगळी कामं स्वत: केली. साई सर्व्हिसमध्ये दीर्घकाळ काम केल्यामुळे कशा सिस्टीमनी काम केलं जातं, ग्राहकाला कसा संपर्क करायचा. फॉलो अप कसा ठेवायचा, मुलांकडून काम कसं करून घ्यायचं हे सगळं त्याच्या अंगवळणी पडलं होतं.

तिथे काम करताना जे ग्राहक केवळ त्याच्या कामावर खुश होऊन तिथे येत असत, ते तुषारच्या या वर्कशॉपमध्ये यायला लागले. त्याची उमेद बघून किंवा त्याच्यावरच्या प्रेमामुळे म्हणा दोनशे रुपये बिल झालं तरी त्यातले काही ग्राहक त्याला बळेच हजार, दोन हजार रूपये द्यायचे. काहीजणांनी इतरांचे संपर्क दिले. सुरुवातीला वेशांतर करून मॅनेजर आणि मेकॅनिकचं काम केलं. त्याबद्दल तो सांगतो, मी साई सर्व्हिसमध्ये मॅनेजर लेव्हलला काम करायचो. पण इथे मीच मॅनेजर आणि मीच मेकॅनिक होतो. मी ग्राहकाला नेहमी चांगल्या कपड्यांमध्ये अटेंड करायचो. गाडी आली की जॉब कार्ड बनवून, गाडीतल्या इन्व्हेंट्रीची लिस्ट करायचो, गाडीला स्क्रॅच, डेंट आहे का, गाडीत पेट्रोल किती आहे, किती कि.मी. चालली आहे असं सगळं पद्धतशीर नोंदवायचो. मग ग्राहक गेला की मेकॅनिकचे कपडे घालून, गाडी जॅकवर लावायची, गाडीचा रूटीनचेक करायचा, बॅटरी, सस्पेन्शन, बेअरिंग, सर्व्हिसिंगच्या गोष्टी चेक करणे अशा सगळ्या गोष्टी करायच्या. वहीवर नोंद करून त्याचं एस्टिमेट काढायचं. परत चांगले कपडे घालून, ग्राहकाला बोलावून ते सांगायचं. गाडी सर्व्हिसिंग, वॉशिंग झाली की ग्राहकाला परत बोलवायचं. चांगले कपडे घालून त्यांना ट्रायल द्यायची. बिल समजून सांगायचं आणि गाडी डिलिव्हर करायची. असा माझा दिनक्रम होता.

चांगल्या ठिकाणी घेतलेला कामाचा अनुभव आणि वाचनाच्या आवडीमुळे सुशिक्षीत आणि प्रतिष्ठीत लोकांशी संवाद साधण्याचं कौशल्य तुषारला प्राप्त झालं. ज्यातून ५०० ग्राहकांचा पक्का बेस त्याच्याकडे तयार झाला आहे. कामं वाढत गेली तसं तुषार गाळे वाढवत गेला. आता त्याच्याकडे ५ गाळे आहेत. डेंटिंग, पेन्टिंग, इन्शुरन्स क्लेमचं काम सुरू केलं. इंटेरियरची कामं, रबिंग, पॉलिशिंगही सुरू केलं. मारुती, फोर्ड, टोयोटा, स्कोडा या गाड्यांची सगळी कामं त्याच्याकडे होतात. तर ऑडी, बीएम डब्ल्यू, मर्सिडीज यांचं डेन्टिंग, पेंटिंग, रुटीन सर्व्हिसिंग, संस्पेनशनचं काम तो करतो. सगळा मिळून १५-१६ जणांचा स्टाफ आता त्याच्याकडे आहे. इतक्या अल्पावधीत तुषारने केलेली प्रगती बघितली की गाड्यांबरोबर माणसांच्या मनाचीही दुरूस्ती आणि सर्व्हिसिंग करण्याचं कौशल्य तुषारला चांगलंच साधलं आहे असं वाटतं.




## फंडू एसएमएस

नजरें मिली तो बेख्याल हो गए, नजरें झुकी तो सवाल हो गए, और इतना घुमाया उसने प्यार में, कि शॉपिंग कराते कराते कंगाल हो गए।

अगर हो वक्त तो मुलाकात किजीए, दिल कुछ कहना चाहे तो कुछ बात किजिए, यूँ तो मुश्कील है हमसे दूर रहना, पर एक लम्हा मिले तो हमें याद किजिए।

दिन भर भटकते रहते हैं अरमान तुझसे मिलने के, न ये दिल ठहरता है, न तेरा इंतजार रूकता है।

# इंटरव्ह्यूला जाताना...

फॅशन पॅशन

फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन, असं म्हणतात. म्हणूनच इंटरव्ह्यूला जाताना आपल्या लूककडे विशेष लक्ष द्यायला हवं. फॅशनसंदर्भातल्या काही चुका टाळायला हव्यात. समोरच्यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडण्याच्या दृष्टीने पेहराव करायला हवा. इंटरव्ह्यूला जाताना नेमकं काय करता येईल याविषयी...

* चुकीच्या फिटिंगचे कपडे अजिबात घालू नका. शर्ट असो किंवा पॅंट, कोणताही कपडा तुमच्यावर शोभून दिसायला हवा. फार घट्ट किंवा ढगळ कपडे घालू नका.
* इंटरव्ह्यूला जाताना भलतंसलतं काहीही घालू नका. काही तरी भन्नाट करण्याच्या नादात आपण आपलं महत्त्व कमी करतो. लोक तुम्हाला गांभीर्याने घेत नाहीत. बो टाय, बेडॅझल्ड तसंच मेटॅलिक टाय, पेस्टल किंवा निळ्या रंगाचे सूट असलं काहीही घालू नका.
* चांगली पॅंट सापडली नाही तर मुलं पटकन जीन्स निवडतात. त्यातही फॉर्मल पॅंटसारखी वाटणारी ब्लॅक जीन्स घातली जाते. पण असं काही करू नका. जीन्स हा कॅज्युअल पेहराव आहे. इंटरव्ह्यूला जीन्स घालून जाणं ही खूप मोठी चूक ठरेल.
* सॅंडल्स किंवा स्निकर्सही अजिबात घालू नका. सॅंडलमध्ये पाय उघडे राहतात. ते अजिबात चांगलं दिसत नाही.
* टॅटू शक्यतो दर्शनी भागावर काढून घेऊ नका. टॅटू काढले असतील तर ते झाकणारे कपडे घाला. पिअर्सिंग केलं असेल तर तेही लपवा. इंटरव्ह्यू घेणाऱ्याचे विचार, दृष्टिकोन आपल्याला माहित नसतो. त्याला हे सगळं विचित्र वाटू शकतं. त्यामुळे अशा वेळी साधा फॉर्मल लूक करणं योग्य ठरतं.



# कसं वागायचं?

एटिकेट्स

दोस्तांनो, नागरिकशास्त्र हा विषय आपण शाळेत शिकतो. नागरिकशास्त्र म्हणजे सिव्हिक सेन्स. सार्वजनिक जीवनात कसं वागायचं हे या शास्त्रातून कळतं. ही जाणीव खरं तर उपजत असावी लागते किंवा विकसित करावी लागते. पण आपण भारतीय इस सेन्स को मारो गोली म्हणून लोकांना त्रास देत असतो. रस्त्यावर कचरा करण्यापासून हॉटेलमध्ये किंचाळत बोलण्यापर्यंत अनेक चुकीच्या गोष्टी आपण करतो. तरूण मंडळी यात मागे नाहीत. दोस्तांनो, ही सिव्हिक सेन्स यंदा नक्की विकसित करा.

सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करताना मोठ्याने गाणी ऐकणं टाळा. स्वत:सोबत हेडफोन्स ठेवा. तुमचं आवडतं गाणं इतरांना ऐकायचं असतंच असं नाही. त्यामुळे हेडफोन्स लाऊन निवांत गाणी ऐका.

* सार्वजनिक ठिकाणी लाडिकपणे आणि मोठ्याने बोलू नका. फोनवर बोलताना काळजी घ्या. शांतपणे बोला. तुमच्या आयुष्यात काय चाललंय, याबद्दल इतरांना काहीच घेणंदेणं नसतं. प्रत्येकाला आपले उद्योग असतात हे लक्षात घ्या.
* रांगेचा आदर राखा. बॅंक, एटीएम किंवा कुठेही रांग असेल तर मध्ये घुसू नका. इतरांनाही महत्त्वाची कामं असू शकतात, याचं भान ठेवा.
* सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ राखण्याचा प्रयत्न करा. वापरल्यानंतर नीट पाणी टाका. आपल्याप्रमाणे इतरही लोक त्यांचा वापर




करणार आहेत, हे लक्षात ठेवा.

* कचरा रस्त्यावर टाकू नका. महागड्या गाडीतून फिरत असताना काच उघडून कचरा बाहेर टाकणं आपल्याला शोभणारं नसतं हे लक्षात ठेवा.
* इतरांचे मेसेज, स्टेटस वाचू नका. दुसऱ्यांच्या कॉम्प्युटर स्क्रीनकडे लक्ष देऊ नका.
* खोकताना, शिंकताना तोंडावर हात ठेवा.
* कुणाकडे उगाचच बघत बसू नका. आपलं लक्ष दुसरीकडे वळवा.

## स्मार्ट टिप्स

### कुकीज कशा डिलिट करायच्या?


कुकीजमुळे तुमची खासगी माहिती उघड होऊ शकते तसंच सिस्टिममधली बरीच जागा व्यापली जाते. म्हणून कुकीज काढून टाकायच्या असतात. यासाठी गुगल क्रोमच्या उजव्या बाजूच्या तीन डॉट्सवर क्लिक करा. आता सेटिंग्जमध्ये जाऊन ॲडव्हान्स ऑप्शन निवडा. आता प्रायव्हसी आणि सिक्युरिटीअंतर्गत येणाऱ्या क्लिअर ब्राउझिंग डाटावर क्लिक करा. इथूनच ब्राउजिंग डाटा, कुकीज आणि कॅच इमेज तसंच फाईल्स डिलिट करता येतात. आता क्लिअर डाटावर क्लिक केल्यावर कुकीज निघून जातील.




## स्मार्ट फीचर्स

### ॲप डाउनलोड करताना...

दोस्तांनो, गूगल प्ले स्टोरवर असंख्य ॲप्स उपलब्ध आहेत. आपणही गरजेनुसार ॲप्स डाउनलोड करत असतो. मात्र ॲप्स डाउनलोड करताना काही गोष्टी ध्यानात ठेवणं गरजेचं असतं.



* ॲप्स डाउनलोड केल्यानंतर काही परमिशन्स मागितली जातात. मात्र तुम्ही सगळ्या परमिशन्स देऊ नका. गरजेनुसार परमिशन्स द्या. * आपल्या स्मार्टफोनमध्ये एकाच पद्धतीची बरीच ॲप्स असतात. आज असंख्य शॉपिंग ॲप्स आहेत. यासोबतच फ्लाईट बुकिंग, कॅब बुकिंग तसंच अन्य बुकिंग्जसाठीही असंख्य ॲप्स आहेत. मात्र सगळी ॲप्स डाउनलोड करू नका. एकाच ॲपची निवड करा आणि त्यावरून बुकिंग करा. * ॲक्टिविटी ट्रॅकिंगचा पर्याय बंद ठेवा. यामुळे स्मार्टफोनची बॅटरी जास्त खर्च होणार नाही.

# कलाशाखेत आहात?

वेगळ्या वाटा

कलाशाखेतल्या विद्यार्थ्यांसाठी करीअरचे अनेक मार्ग आहेत. पारंपरिक पर्यायांसोबतच अनेकविध क्षेत्र उपलब्ध झाल्याने कलाशाखेतले विद्यार्थीही भरारी घेत आहेत. हे विद्यार्थी इंग्लिश, इतिहास, अर्थशास्त्र अशा विषयांमध्ये एमए करू शकतात. एमफील किंवा डॉक्टरेट मिळवून पुढे जाऊ पाहणाऱ्या, करीअर करु पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी एमएकडे वळावं. विविध क्षेत्रांमध्ये संशोधन करण्याची इच्छा असणारे विद्यार्थी एमए करून पुढे जाऊ शकतात. शिक्षणक्षेत्रात करीअर करण्याची इच्छा असेल तर आपल्या आवडत्या विषयात एमए पदवी मिळवून पुढे जाता येईल. शिक्षकी पेशा स्वीकारायचा असेल तर बॅचलर ऑफ एज्युकेशन म्हणजे बीएड करता येईल. या माध्यमातून तुम्ही सरकारी शाळेत शिक्षक म्हणून रूजू होऊ शकता. अर्थात सरकारी शाळांमध्ये शिक्षण बनवण्यासाठी टिचर्स एलिजिबिलिटी टेस्ट उत्तीर्ण होणं बंधनकारक करण्यात आलं आहे. बीएड करून तुम्ही ही परीक्षा देऊ शकता. विविध विषयांमधले डिप्लोमा आर्टसच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरू शकतात. अभिनय, ॲनिमेशन, फिल्म मेकिंग, कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, कला, क्रीडा यापैकी आवडत्या विषयांमधला डिप्लोमा तुमच्या करीअरचं भविष्य निर्माण करू शकतो. कलेच्या माध्यमातून भविष्य घडवायचं असेल तर कला शाखेची निवड करता येईल. त्यामुळे आता कलाशाखेतही भरपूर पर्याय उपलब्ध झाल्याने प्रत्येकाने आपली वाट निवडायला हवी.




## बी ॲलर्ट

### ऑनलाईन शॉपिंग करताय?

सध्याच्या काळात ऑनलाईन शॉपिंगचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. विविध ॲप्स आणि वेबसाईट्सच्या माध्यमातून ऑनलाईन शॉपिंग केलं जातं. पण या द्वारे फसवणूकही होऊ शकते. बनावट वेबसाईट्सच्या माध्यमातून ग्राहकांकडून पैसे उकळले जातात. अशीच एक घटना मध्यंतरी घडली. म्हणूनच फेक ऑनलाईन वेबसाईट्सची ओळख पटवणं गरजेचं आहे. वेबसाईट ओपन केल्यावर ॲड्रेसबारमध्ये एटीटीपी आहे की एचटीटीपीएस आहे हे आधी जाणून घ्या. एसचा अर्थ असा की ही वेबसाईट आर्थिक व्यवहार करण्यासाठी सुरक्षित आहे. मात्र एस नसल्यास सावध रहा. वेबसाईट सुरक्षित असल्यास ॲड्रेसबारमध्ये लॉकची खूणही दिसते. बरीच सवलत मिळत असेल तर सावध रहा.




# घरातून विरोध आहे!

मॅच मेकिंग

मी २४ वर्षांचा तरुण असून गेल्या आठ महिन्यांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. आयुष्यात स्थिरस्थावर झाल्यावर आमचा लग्न करायचा विचार आहे. पण तिच्या मोठ्या भावाला आमचं नातं पसंत नाही. त्यामुळे माझ्याशीच नाही तर तिच्याशीही तो कठोरपणे वागतो. त्याच्या भुलथापांना बळी पडून तिलाही हे नातं संपवायचं आहे. प्रेमात अशा गोष्टी घडत असतात. त्यामुळे यातून मार्ग काढायला हवा, असं मला वाटतं. मी काय करू? आमच्या नात्यात पुढे अडचणी येतील का? भविष्यात आमचं लग्न होईल का?

उत्तर : नात्यांमधली प्रत्येक गोष्ट वाटते तितकी सोपी नसते आणि प्रश्न तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबाचा असेल तर विचार करण्याची गरज आहे. बरेचदा एखादं नातं स्वीकारण्यासाठी कुटुंबियांना वेळ लागू शकतो. आपल्या मुलांच्या जोडीदारांबाबतच्या त्यांच्या अपेक्षा, कल्पना वेगळ्या असू शकतात. सध्याच्या परिस्थितीत तू धीर धरायला हवा. मैत्रीण आणि तिच्या कुटुंबियांना थोडा वेळ द्यायला हवा. दुसरं म्हणजे तू मैत्रिणीशी स्पष्टपणे बोल. तुझ्या भावना तिला सांग. तुम्ही दोघं समुपदेशकाची मदत घेऊ शकता. तुमच्याकडे भरपूर वेळ आहे. वय पाहता तुम्ही अजूनही करीअरमध्ये स्थिरस्थावर झाला नसाल. त्यामुळे मैत्रिणीच्या कुटुंबाला वेळ द्यायला हवा. त्यांना नीट समजावून सांगायला हवं. मैत्रिणीने तुझ्यावर विश्वास ठेवायला हवा. सगळं काही सुरळीत पार पडलं तर नात्यांमध्ये अडचणी येणार नाहीत.



# चविष्ट ऑम्लेट साल्सा

झटपट रेसिपी

दोस्तांनो, अंड्याचं ऑम्लेट हा होस्टेलियन्सचा आवडता पदार्थ. भूक लागली की अंडी आणायची आणि मस्त ऑम्लेट- पाव खायचा. अगदी झटपण तयार होणारा असा हा पदार्थ. आपल्या नेहमीच्या ऑम्लेटला आपण ट्विस्ट देऊ शकतो. ऑम्लेट साल्सा हा प्रकार नक्की ट्राय करा.

**साहित्य:** दोन अंडी, चिरलेला कांदा आणि टोमॅटो, चिरलेली भोपळी मिरची, साल्सा चटणी, मोझरेला चीझ आणि मीठ.

**कृती:** अंडी फेटून घ्या. त्यात कांदा, टोमॅटो, भोपळी मिरची घालून नीट हलवा. त्यात सालसा चटनी आणि किसलेलं चीज घाला. चवीपुरतं मीठ घाला. तवा घ्या. त्यावर थोडं तेल किंवा बटर घाला. त्यावर मिश्रण ओता. दोन्ही बाजूंनी शिजवून घ्या. ऑम्लेटवरही थोडं किसलेलं चीज घालता येईल. हे ऑम्लेट ब्रेड किंवा पावासोबत मस्त लागतं. ब्रेडचे टोस्ट करून घ्या आणि गरमागरम खा.



## ॲप वर्ल्ड

### स्मार्टवॉच घेताय?

सध्या स्मार्टफोनप्रमाणेच स्मार्टवॉच ही सुद्धा काळाची गरज आहे. हातात एखादं स्मार्टवॉच हवंच. तुम्हीही स्मार्टवॉच घेण्याच्या विचारात असाल तर या टिप्स नक्कीच उपयोगी पडतील. * महागडं स्मार्टवॉच घेताना त्याची ओएस कॉम्पिबिलिटी तपासून बघा. म्हणजेच ते स्मार्टवॉच ॲंड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही ओएस सिस्टिमवाल्या फोनशी कनेक्ट व्हायला हवं. * तुमच्याकडे आयफोन असेल तर ॲपलचं स्मार्टवॉच घेणं योग्य ठरेल. ॲंड्रॉईड स्मार्टफोन असल्यास वेअर ओएसवालं स्मार्टवॉच खरेदी करा.
* महागड्या स्मार्टवॉचमधल्या फिटनेस फीचर्सकडे लक्ष द्या.




# गेम ऑफ थ्रोन्सच्या चाहत्यांसाठी

भटकंती

गेम ऑफ थ्रोन्सच्या चाहत्यांची या जगात अजिबात कमतरता नाही. त्यातही तरूणाईला त्यांनी खूप वेड लावलं आहे. कॅरेक्टर्सपासून ॲक्शन सीन्स, पेहरावापर्यंत त्यांचं सगळं काही भन्नाट. म्हणूनच गेम ऑफ थ्रोन्स प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवतात. यातली लोकेशन्स आपल्याला मंत्रमुग्ध करतात. ही लोकेशन्स परदेशातली असली तरी भारतातही तशीच लोकेशन्स आहेत. गेम ऑफ थ्रोन्सचे चाहते या लोकशन्सना भेट देऊ शकतात.

* गेम ऑफ थ्रोन्स म्हणजे जीओटीचं नॉर्थ ऑफ द वॉल आणि लडाखमधली झंस्कार व्हॅली यात खूप साम्य आहे. चारही बाजूंना साचलेला बर्फ आणि गोठलेली तळी तुम्हाला झंस्कार व्हॅलीमध्ये पहायला मिळतील.
* यातल्या सेव्हन किंग्डम्समध्ये किंग्ज रोड हा सर्वात मोठा आणि प्रशस्त हाय वे दाखवण्यात आला होता. उत्तराखंडमधल्या जिम कार्बेटमध्ये तुम्हाला हा अनुभव मिळू शकतो.
* ड्रॅगनस्टोन हा नदीकाठचा सुंदर महाल आपण यात पाहू शकतो. जयपूरमधला मेहरानगड किल्लाही असाच आहे. इथे आल्यावर जीओटीच्या चाहत्यांना ड्रॅगनस्टोनची आठवण येईल. महाराजा मानसिंह यांनी हा किल्ला बांधला होता. इथे येणाऱ्या पर्यटकांना याची भुरळ पडते.
* यातली क्वॉर्थ इंपोजिंग वॉल पहायची असेल तर उत्तराखंडच्या फॉरेस्ट रिझर्व्ह इन्स्टीट्यूटमध्ये जा. या ठिकाणी चित्रपट आणि मालिकांचं चित्रिकरण होतं. हे खूप सुंदर ठिकाण आहे.
* तलावांच्या मधोमध वसलेला सुंदर राजवाडा मिरिन उदयपूरमधल्या लेक पॅलेससारखाच आहे. इथे बॉलिवूडमधल्या बऱ्याच चित्रपटांचं शूटिंग झालं आहे. अनेकजण प्री वेडिंग शूटसाठी हे स्थान निवडतात.
* यातलं द किंग्डम ऑफ रिव्हरलॅंड आणि मेघालयचा उमियन लेक सारखेच वाटतात. शांत आणि सुंदर असा हा तलाव पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरला आहे. त्यामुळे मेघालयला गेल्यावर हे ठिकाण नक्की बघा.



# लष्करी हद्दजवळील व ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात घरांचे बांधकाम करताना अंतराची मर्यादा कमी व्हावी

## शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन जाधव यांनी घेतली खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट, केंद्र शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी

नगर – शहरातील लष्करी हद्दी जवळ व ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात नवीन घर बांधण्यासाठी व दुरुस्तीसाठी येणाऱ्या अडचणी दूर होण्यासाठी केंद्र शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कडे केली.


लष्करी हद्द व ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात घरांचे बांधकाम करताना अंतराची मर्यादा कमी व्हावी या मागणीसाठी शिवसेना शहर प्रमुख सचिन जाधव यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतली.

नुकतेच दिल्ली येथे खासदार शिंदे यांची भेट घेऊन सदर प्रश्नांबाबत लक्ष वेधले. पुरातत्त्व विभागाच्या तरतुदी अंतर्गत ऐतिहासिक वास्तूच्या १०० ते ३०० मीटर पर्यंत नवीन बांधकाम करता येत नाही. तर जुने बांधकामाच्या दुरुस्तीसाठी देखील परवानगीला अनेक अडचणी येत आहे. मर्यादीत उंची पर्यंत बांधकाम करण्याचे आदेश आहेत. तसेच लष्करी हद्दीतही घरांच्या बांधकामाबाबत परवानगीला अनेक अडचणी येत आहे. तसेच लष्करी हद्दी जवळील १०० ते ५०० मीटर पर्यंत घरांच्या बांधकामांना परवानगी नाकारली जात आहे. या जाचक नियमांमुळे स्वत:च्या मालकीची असलेली जागा सोडून नागरिकांना दूर ठिकाणी जावे लागत आहे.

ऐतिहासिक शहरात अनेक ठिकाणी विविध ऐतिहासिक वास्तू आहे. तर नगर शहर लष्करी हद्दीने व्यापले आहे. यामुळे शहराचा विकास होण्यास मर्यादा निर्माण होत आहे. नागरिकांना परवानगी घेऊन बांधकाम करण्याची इच्छा असताना देखील परवानगी मिळत नसल्याने विनापरवाना बांधकाम करण्याची वेळ येत आहे. यामुळे शासनाचा देखील मोठ्या प्रमाणात महसुल बुडत असून, नागरिकांना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले.

शहरीकरण झपाट्याने वाढत असताना शहरातील लष्करी हद्दी जवळ व ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात बांधकामाची परवानगी देताना अंतराची मर्यादा १० मीटर पर्यंत आणण्याची मागणी करण्यात आली असून, यासाठी केंद्र शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी जाधव यांनी खासदार शिंदे यांच्याकडे केली आहे.

# कराटे प्रशिक्षक अमित बडदे जपान डिग्री परीक्षा उत्तीर्ण

## जपानी मान्यता प्राप्त कराटे परिक्षा उत्तीर्ण होणार पहिले नगरकर

नगर – शहरातील कराटे प्रशिक्षक अमित प्रताप बडदे यांनी कराटेची जपान डिग्री परीक्षा उत्तीर्ण केली आहे. जपानी मान्यता प्राप्त कराटे परीक्षा उत्तीर्ण होणारे ते पहिले नगरकर ठरले आहेत. परीक्षा २७ आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन शाळा, नेरूळ, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. जपान कराटे दो कैबुकाईचे अध्यक्ष हान्शी गेनकू सातो यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.


जपान कराटे दो कैबुकाईचे अध्यक्ष हान्शी गेनकू सातो यांच्या हस्ते प्रशिक्षक अमित बडदे यांना डिग्री परिक्षेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

परीक्षेसाठी हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र आदी राज्यातील प्रशिक्षक आणि प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. फेडरेशनचे डायरेक्टर व इंडिया प्रेसिटेटिव्ह शिरीष किसन तळेकर यांनी अमित प्रताप बडदे यांचे अभिनंदन केले. तसेच, जिल्ह्यातील पहिल्या अधिकृत सभासद आणि प्रतिनिधी म्हणून त्यांचा गौरव केला.

# संघटितपणे संघर्ष केल्याशिवाय बँक मित्रांचे प्रश्न सुटणार नाही

## कॉ. देविदास तुळजापूरकर यांचे प्रतिपादन; महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या बैठकीत बँक मित्रांच्या विविध प्रश्नांवर चर्चा

नगर – संघटितपणे संघर्ष केल्याशिवाय बँक मित्रांचे प्रश्न सुटणार नाही. ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या झेंड्याखाली सर्वांना एकवटावे लागणार आहे. बँक प्रशासन संघटनेचे शत्रू नसून, त्यांच्या अन्यायकारक धोरण विरोधात संघर्ष आहे. एकासाठी सगळे, सगळ्यांसाठी एक! हे संघटनेचे धोरण आहे. बँक मित्रांच्या प्रश्नांची सोडवणुक न केल्यास जनता व बँकेमधील दुवा संपुष्टात येऊन ही व्यवस्था कोलमडणार असल्याचा धोका महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनचे अध्यक्ष कॉ. देविदास तुळजापूरकर यांनी व्यक्त केला.


महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या बैठकीत बँक मित्रांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

अहिल्यानगर शहरात बँक मित्रांच्या प्रश्नावर महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्यावतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मार्गदर्शन करताना कॉ. तुळजापूरकर बोलत होते. याप्रसंगी जनरल सेक्रेटरी कॉ. शिरीष राणे, खजिनदार कॉ. संजीव डोंगरे, सहाय्यक जनरल सेक्रेटरी (बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन पुणे) कॉ. संजय दळवी, ऑर्ग. सेक्रेटरी कॉ. प्रकाश कोटा, जनरल सेक्रेटरी (महाराष्ट्र ग्रामीण बँक) कॉ. सुजय नळे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे कॉ. तुळजापूरकर म्हणाले की, सरकारच्या जनधन, अटल पेन्शन, जीवन सुरक्षा, जीवन ज्योती या योजना चांगल्या प्रकारे सफल होण्यात व अंमलात आणण्यास बँक मित्रांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. परंतु बँक मित्रांचे काही प्रश्न असल्यास बँक व्यवस्थापन तसेच सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. संघटनेच्या माध्यमातून एकजुटीने संघर्ष करुन आपले हक्क मिळविण्याचे त्यांनी आवाहन केले. तर संघटनेच्या वतीने सर्व जिल्हा प्रतिनिधींची बैठक पुणे येथे होणार असून, त्यामध्ये बँक मित्रांच्या प्रश्नावर चर्चा करुन पुढील दिशा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

या सभेला जिल्हा प्रतिनिधी श्रीकांत साबळे, भूषण थोरात, नितीन चिखले, नगर कार्यकारणी सदस्य दत्तात्रय शिंदे, दीपाश्री चोळके, मच्छिंद्र तांबे, विजय सांगळे, अनुराधा खडके, अभिजीत लेलकर, गोकुळ दाकांडेकर, विजय कोष्टी, नारायण वाघ, केशव बुलाखे, अशोक रणसिंग, सुमित शेलार, नवनाथ शेलार, दिलीप जगताप, आशिष गोरे, अमोल खुडे, शिवम वाघ आदींसह विविध बँकांचे बँक मित्र उपस्थित होते. विविध शाखांच्या बँक मित्रांनी या बैठकीत आपले अडचणी व प्रश्न मांडले. सध्या बँक मित्रांचे कमिशन हे कमी करण्यात आले आहे. त्यांना कुठल्याही सुट्ट्या नाहीत, सेवेमध्ये कुठल्याही मेडिकल सुविधा व सुरक्षितता नाही, वेळेचे बंधन नसल्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले.

गरीब जनतेसाठी बँक मित्र जीवन वाहिनी बनले आहे. सर्व बँक मित्र सुरुवातीला प्रत्यक्ष बँकेशी करार करून त्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करत होते, पण आता बँक कॉर्पोरेट एजन्सीच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीवर त्यांची नेमणूक करत आहेत. त्यांना मिळणाऱ्या कमिशनमध्ये खूप कपात करण्यात आली आहे. हे तुटपुंज कमिशनही वेळेवर देण्यात येत नाही. त्याचा दर मनमानी पद्धतीने निश्चित केला जातो. अनेक जास्तीचे कामे विना मोबदला करून घेतली जातात. बँका नियुक्तीपत्र, शर्ती अटीबाबतचे पत्र बँक मित्रांना देत नाही. यामुळे बँक मित्रांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, सदर प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या माध्यमातून त्यांना संघटित करुन पाठपुरावा सुरु करण्यात आलेला असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# शेअर ट्रेडिंगमध्ये १ कोटी १० लाखांची फसवणूक करणारी सोलापूरची चौघा जणांची टोळी नगरच्या पोलिसांनी पकडली

नगर – एसएमसी ग्लोबल सिक्युरिटीज ही 'सेबी'कडे नोंदणीकृत कंपनी असल्याचे सांगत नगर मधील एका आयटी इंजिनियरला २० ते ३० टक्के नफ्याचे आमिष दाखवत मोबाईल पवरून शेअर ट्रेडिंग करण्यास भाग पाडले. या माध्यमातून १ कोटी १० लाख ८० हजार रुपये जमा झाल्यावर त्याला पवर व व्हॉट्स पवर ब्लॉक करून त्याची फसवणूक करणारी सोलापूर जिल्ह्यातील चौघांची टोळी नगरच्या सायबर पोलिसांच्या पथकाने पकडली आहे.


शेअर ट्रेडिंग मध्ये ज्यादा नफ्याचे आमिष दाखवत नगरच्या आयटी इंजिनियरची १ कोटी १० लाख ८० हजारांची फसवणूक करणाऱ्या सोलापूरच्या टोळीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत नगरच्या सायबर पोलिसांचे पथक.

प्रवीण दत्तू लोंढे (वय ३८), शिवाजी साहेबराव साळुंके (वय ४०) सागर उर्फ केशव कुलकर्णी (सर्व रा. वडवळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर), महावीर दिगंबर कांबळे (रा.गोटेवाडी, ता.मोहोळ, जि. सोलापूर) असे या आरोपींची नावे आहेत. यातील ३ आरोपींनी फिर्यादी यांच्याशी वारंवार संपर्क साधत त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांनी आपली संस्था ही सेबीकडे नोंदणीकृत संस्था असल्याचे कागदपत्र दाखवले.

कंपनीच्या पवरून शेअर ट्रेडिंग केल्यास जादा नफा मिळेल, असे अमिष दाखवून राऊत यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्यांच्या वर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी महिनाभरात एकूण १ कोटी १० लाख ८० हजार रुपये कंपनीने दिलेल्या बँक खात्यावर जमा केले. मात्र त्यांना कुठलाही परतावा न देता फसवणूक केली. याबाबत २७ जानेवारीला नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर अप्पर पोलिस अधिक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याचे पो.नि.मोरेश्वर पेंदाम, उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलिस अंमलदार योगेश गोसावी, अभिजित अरकल, राहुल हुसळे, निळकंठ कारखेले, अरुण सांगळे, मोहम्मद शेख, मल्लिकार्जुन बनकर, दिगंबर कारखेले, महिला अंमलदार दिपाली घोडके, सविता खताळ, प्रितम गायकवाड यांनी या क्लिष्ट गुन्ह्याचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास सुरु केला.

त्यातील काही रक्कम महावीर दिगंबर कांबळे याच्या बँक खात्यात पाठविण्यात आलेली आढळून आली. त्यामुळे पथकाने सोलापूर येथे जावून कांबळे याला ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली देत लोंढे, साळुंके, कुलकर्णी यांच्या समवेत गुन्हा केल्याचे सांगितले. या तिघांचा शोध घेत असताना त्यांना मुंबईच्या गावदेवी पोलिस ठाण्यातील एका गुन्ह्यात पकडण्यात आलेले असून ते आर्थर रोड मध्यवर्ती कारागृहात असल्याची माहिती मिळाली. नगरच्या पथकाने न्यायालयाच्या परवानगीने या तिघांना नगरच्या सायबर पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात वर्ग करून ताब्यात घेतले आहे. या गुन्ह्याच्या अनुशंगाने त्यांच्या कडे कसून चौकशी करण्यात येत आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवा

मुंबई – राज्यात शासकीय जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे करण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या ज्या ज्या जागेवर अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत ती सर्व अतिक्रमणे निष्कासित करून त्या जागा तातडीने ताब्यात घेण्याचे आदेश राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने काढले आहेत. शासनाचे उपसचिव निरंजन तेलंग यांनी याबाबतचा शासन आदेश जारी केला आहे.

राज्यात सर्वच शहरात शासकीय मालकीच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर असून या जमिनीवर गोरगरीबा पासून धनदांडग्यांची अतिक्रमणे आहेत. ही सर्व अतिक्रमणे काढून जमिनी शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळेच सदर आदेश काढण्यात आला असून त्यात

**शासनाचे आदेश, अतिक्रमणांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा**

म्हंटले आहे की, राज्यात अनेक जमीनी, भुखंड शासनाच्या विविध विभागांच्या अखत्यारित आहेत. त्यातील काही जमीनी, भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावावर आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनेक जागांवर अतिक्रमण झालेले दिसुन येते. या जागेवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांकडून आवश्यक कार्यवाही करण्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. त्यामुळे यापुढे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागांवर अतिक्रमण होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भूखंडावरील, जमीनीवरील अस्तित्वातील अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करण्यात यावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेची खाजगी व्यक्ती, संस्था, महामंडळे तसेच शासनाचे इतर विभागाकडून कोणत्याही कारणास्तव मागणी प्राप्त झाल्यास व सदर जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यास त्यास शासन मान्यता घेणे आवश्यक राहील. यापुढे शासनाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील जमीनीचे हस्तांतरण अथवा भाडयाने दिल्याचे आढळल्यास संबंधितां विरुद्ध शिस्तभंगाची व न्यायोचित कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा या शासन आदेशात देण्यात आला आहे.

# परीक्षाकाळात विद्यार्थी, पालकांना रस्त्यांच्या कामांमुळे अडचणी येणार नाही, उपाययोजना कराव्यात, शाळा, कॉलेज परिसरात प्रलंबित कामे करून घ्यावे

## अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांचे आदेश, बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली पाहणी

नगर – महानगरपालिकेमार्फत शहरात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. यात प्रमुख रस्त्यांवर असलेल्या महाविद्यालय व शाळांच्या परिसरात कामे सुरू आहेत. पुढील आठवड्यात दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. परीक्षा काळात रस्त्यांच्या कामामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक, शाळांच्या कर्मचाऱ्यांना त्रास होऊ नये, या दृष्टीने तत्काळ रस्त्याच्या कामांची पाहणी करून उपाययोजना कराव्यात, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी बैठक घेऊन बांधकाम विभागाला दिले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी तत्काळ रस्त्यांची पाहणी केली.


रस्त्याच्या कामांची पाहणी करून उपाययोजना कराव्यात, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी बैठक घेऊन बांधकाम विभागाला दिले.

लवकरच दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. त्यामुळे सारडा कॉलेज, न्यु आर्टस् कॉलेज, रेसिडेन्शियल हायस्कूल, फिरोदिया हायस्कूल, केडगाव येथील अंबिका विद्यालय आदी भागात सुरु असलेल्या व सुरू होणाऱ्या रस्त्यांच्या कामांचा आढावा आयुक्त यशवंत डांगे यांनी घेतला. पत्रकार चौकापासून ते दिल्लीगेट रस्त्याचे काम सुरू आहे. या मार्गावर सारडा, न्यू आर्टस्, रेसिडेन्शियल कॉलेज आहेत. लालटाकी येथे शाळा आहे. तसेच, वाडिया पार्क संकुलासमोर फिरोदिया संस्थेच्या तीन शाळा व इतर शाळा आहेत. तेथील कामांना गती देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी. काम तत्काळ पूर्ण होणार नसले, तरी परीक्षा काळात शाळेत अथवा महाविद्यालयात येण्याजाण्यासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना अडचणी येणार नाहीत, या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. बांधकाम विभागासह पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी व शाळा, कॉलेज परिसरात प्रलंबित असलेली कामे करून घ्यावीत, अशा सूचना आयुक्त यशवंत डांगे यांनी दिल्या.

शहरासह केडगाव येथे अंबिका विद्यालय परिसरात रस्त्याचे काम सुरु होणार आहे. त्या ठिकाणीही समक्ष पाहणी करून शाळेत जाण्यासाठी अडथळे होणार नाहीत, यादृष्टीने नियोजन करून काम सुरू करावे, असे त्यांनी सांगितले. आयुक्त यशवंत डांगे यांनी सूचना देताच बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ समक्ष पाहणी केली व ठेकेदार प्रतिनिधींना सूचना दिल्या.

दरम्यान, रस्त्यांची कामे सुरू असलेल्या ठिकाणी महापालिका उपाययोजना करत असली तरी काही अडचणी येऊ शकतात. अशावेळी नागरिकांनी पुढाकार घेऊन त्यांना मदत करावी, महापालिकेकडून सर्व सहकारी केले जाईल, असे आवाहनही यशवंत डांगे यांनी केले आहे.

# गोवंश जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगर – कत्तल करण्याच्या उद्देशाने टेम्पोमध्ये गोवंश जनावरे दाटीवाटीने बांधून त्यांना चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडला आहे. ३ फेब्रुवारीला सायंकाळी केडगाव परिसरातील लिंकरोडवर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४ गोवंश जनावरे व बोलेरो पिकअप असा ५ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबतची माहिती अशी की कोतवाली पोलीस शहर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना त्यांना पोलीस निरीक्षक दराडे यांनी कळविले की केडगाव येथील लिंक रोडवर गोवंश जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो लोकांनी पकडला असून तुम्ही तत्काळ जाऊन कारवाई करा. असे कळवल्याने कोतवाली पोलीस तत्काळ लिंक रोड केडगाव येथे गेले असता, त्याठिकाणी लोकांची खूप गर्दी जमलेली दिसली. तसेच एक बोलेरो पिकअप (क्र.एम एच ०४ एच एस ००६२) हा दिसून आला.

पोलिसांनी पिकअप ची पाहणी केली असता, त्यात तीन बैल व एक गोऱ्हे दाटीवाटीने बांधलेले दिसले. त्यावेळी टेम्पो चालक युवराज शिवाजी लकडे (वय १९, रा. खामगाव, ता.जि.बीड) व त्या सोबत असलेला भागवत परमेश्वर बुधनर (वय २९, रा. खामगाव ता.जि. बीड) यांना पोलिसांनी गाडीतून प्राणी वाहतुक करण्याचा परवाना आहे काय ? असे विचारले असता, त्यांनी प्राणी वाहतुकीच्या परवान्याबाबत काहीएक माहिती दिली नाही. त्यामुळे पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील पिक अप व जनावरे असा मुद्देमाल जप्त केला. तसेच दोघांवर गुन्हा दाखल केला.

# 'शिक्षक भारती' ची जिल्हा कार्यकारिणी जाहीर


प्रा. नरेंद्र लहिरे | बाळासाहेब तांबे | प्रा.संजय तमनर | प्रा.संतोष आठरे | प्रा. साई थोरात

नगर – शिक्षक भारती संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यकारणीवर सर्वानुमते पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. संघटनेच्या राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, आमदार कपिल पाटील, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, विनाअनुदान धोरण समितीचे राज्याध्यक्ष जयवंत भाबड, महिला अध्यक्ष रूपालीताई कुरुमकर, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, जिल्हाध्यक्ष रामराव काळे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा कार्यकारणीवर नियुक्ती सर्वानुमते देण्यात आली आहे.

श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिर्डी येथील प्रा. संजय भाऊराव तमनर यांची अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच चंद्रगीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मांजरी तालुका राहुरी येथील तांबे बाळासाहेब मकाजी यांची जिल्हा मार्गदर्शक पदी निवड करण्यात आली.

पोहेगाव कनिष्ठ महाविद्यालय येथील प्रा. नरेंद्र लहिरे यांची कोपरगाव तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. प्रेमराज सारडा महाविद्यालय येथील प्रा. साईनाथ थोरात यांची अहिल्यानगर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. पाथर्डी तालुका उपाध्यक्षपदी संतोष आठरे यांची निवड करण्यात आली.

# निरोगी आरोग्यासाठी महिलांना योग-प्राणायामचे वाण

## डॉ. पूजा कासवा यांनी दिला सदृढ आरोग्याचा संदेश; आनंद योग केंद्रात रंगला हळदी कुंकू कार्यक्रम

नगर – महिलांना निरोगी आरोग्यासाठी योग-प्राणायामचे वाण देवून सावेडी येथील आनंद योग केंद्रात हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. वर्षभर निरोगी आरोग्याची चळवळ चालविणाऱ्या आंनद योग केंद्राच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात परिसरातील महिला सहभागी झाल्या होत्या.


आनंद योग केंद्रात हळदी कुंकू कार्यक्रम रंगला.

या कार्यक्रमात डॉ. पूजा कासवा यांनी महिलांना थायरॉईड, मेनोपॉज, ऑस्टिपोलीसिस या आजारांवर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, टी ३, टी, हार्मोन्स असंतुलित झाले की थायरॉईड होतो. भारतात चार कोटी पेक्षा जास्त लोकांना थायरॉईड आहे. हायपो थायरॉईड मध्ये मेटाबॉलीजम कमी होऊन वजन वाढते. हायपर थायरॉईड मध्ये मेटाबॉलीजम वाढून वजन कमी होते. थायरॉईड ग्रंथी शरीराची मॅनेजर असून, ते चांगले राहण्यासाठी नारळ, नारळाचे तेल, अक्रोड, दूध, दही, पनीर, तूप खावे. सोयाबीन, पत्ताकोबी, फुलकोबी खाणे टाळण्याचे त्यांनी आवाहन केले.

ऑस्टियोपोरोसिस मध्ये वय वाढल्याने हाडांची झीज होऊन हाडे ठिसूळ होतात. शरीराला दररोज १ हजार मिलीग्रॅम कॅल्शियमची गरज असते. शंभरग्रॅम नाचणी मध्ये ३०० ग्रॅम कॅल्शियम मिळते. कॅल्शियम शरीरात शोषणासाठी डी व्हिटॅमिनची आवश्यकता असते. दररोज १५ ते २० मिनिटे सूर्य प्रकाश घ्यावा. मेनोपॉज मध्ये एस्ट्रोजेन, प्रोजेस्टेरॉन, हार्मोन्स कमी होतात. घाम येणे, वजन वाढणे, चिडचिड होणे, मूड जाणे, युरीन कंट्रोल नसणे अशी लक्षणे दिसतात. योग, व्यायामाने एन्डोर्फीन्स, सेरोटेनिन, डोपामाईनहार्मोन्स वाढतात. मेनोपॉजचा त्रास कमी होत असल्याची माहिती डॉ. कासवा यांनी दिली.

यावेळी सादर करण्यात आलेल्या योगा डान्सचा आनंद उपस्थित महिलांनी घेतला. अलका कटारीया यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अपेक्षा संकलेचा यांनी महीलांसाठी मनोरंजनात्मक व बौद्धिक स्पर्धा घेतल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उषा पवार, सोनाली जाधववार, पूजा ठमके, प्रतिक्षा गीते, रेखा हाडोळे, स्वाती वाळुंजकर, संगीता जाधव यांनी परीश्रम घेतले.

